

घरचा स्वाद,
घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल ®
शुध्द घी
म्हशीचे व गायीचे साजूक तुप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com


# आपला महाराष्ट्र


मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३०७ ■ रविवार ९ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.NO./DHL/53/24-26



PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie * Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos * Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters * Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
B'Live ® Delightful delicacies!
SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
B'Live Restaurant
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768
Also available on zomato SWIGGY


# चाळीस वर्षांपूर्वीचे बोफोर्स प्रकरण अखेर संपुष्टात शेवटची याचिकाही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली



**नवी दिल्ली, दि.८- सुमारे चाळीस वर्षांपूर्वीच्या बोफोर्स घोटाळ्याशी संबंधित शेवटची याचिकाही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. यामुळे आता हे प्रकरण पूर्णपणे संपुष्टात आले आहे. न्यायमूर्ती जे. बी. पारदीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने सांगितले की, आता या प्रकरणात पुढील सुनावणीची गरज नाही.**

यासंदर्भात २००५ च्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाला आव्हान देणारे अपीलही न्यायालयाने ऐकण्यास नकार दिला, ज्यामध्ये हिंदुजा बंधू आणि बोफोर्स कंपनीला निर्दोष मुक्त करण्यात आले होते. हे प्रकरण १९८६ च्या त्या कराराशी संबंधित आहे, ज्यामध्ये भारताने स्वीडनच्या बोफोर्स कंपनीकडून १,४३७ कोटी रुपयांच्या तोफा खरेदी केल्या होत्या. नंतर आरोप झाले की, या व्यवहारात कमिशन दिले गेले होते. घोटाळ्याच्या या आरोपामुळे राजीव गांधी १९८९ च्या निवडणुकीत बॅकफूटवर आले होते.

हे प्रकरण १९८६ मध्ये भारत सरकार आणि स्वीडनची कंपनी एबी बोफोर्स यांच्यात झालेल्या १,४३७ कोटी रुपयांच्या तोफ खरेदी कराराशी संबंधित आहे. १९८७ मध्ये हा करार मिळवण्यासाठी कथितरित्या कमिशन (लाच) देण्यात आल्याचा आरोप झाला. यानंतर हे प्रकरण देशातील सर्वात मोठ्या राजकीय घोटाळ्यांपैकी एक बनले. बोफोर्स प्रकरण बराच काळ चर्चेत राहिले, पण तो न्यायालयात टिकू शकले नाही. याची सर्वांत मोठी कारणे तपास आणि पुराव्यांशी संबंधित त्रुटी होती.

दिल्ली उच्च न्यायालयाने २००५ च्या निर्णयात सीबीआय आरोपांना सिद्ध करण्यासाठी पुरेसे आणि विश्वासार्ह पुरावे देऊ शकली नाही. आरोप तर लावण्यात आले, पण त्यांना थेट कोणत्याही आरोपीशी जोडणारा दुवा सापडला नाही, असे म्हटले. तपासात सीबीआयला स्वीडनमधून जी कागदपत्रे मिळाली, ती खरी नव्हती आणि योग्यरित्या सत्यापितही नव्हती. न्यायालयाने म्हटले की, अशा कागदपत्रांच्या आधारे कोणालाही आरोपी बनवणे योग्य नाही आणि यामुळे न्याय प्रक्रियेचा गैरवापर होतो. (पान ८ वर)

## हिमाचल प्रदेशात बस अपघातात आठ ठार

चंबा, दि.८- हिमाचल प्रदेशमधील चंबा जिल्ह्यात बैरागढ-चंबा मार्गावर आज सकाळी ८ ऑगस्ट रोजी भीषण अपघात झाला. एक खासगी बस बैरागढहून चंबाकडे जात असताना, देविकोठीजवळील चालुज वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्यावरून खाली कोसळली आणि थेट शंभर फूट खाली असलेल्या दुसऱ्या रस्त्यावर जाऊन पडली.

प्राथमिक माहितीनुसार, या भीषण अपघातात बसचालक आणि वाहकासह एकूण आठ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच, जखमींपैकी सुमारे सात प्रवाशांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. शर्मा ट्रॅव्हल्सची बस सकाळी साडेसहाच्या सुमारास बैरागढहून चंबाकडे निघाली होती. अवघे तीन किलोमीटरचे अंतर कापल्यानंतर, चालुज वळणाजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस खाली (पान ८ वर)

# पीडित मुलांची गोपनीयता, सुरक्षित समुपदेशन आणि विशेष व्हॉट्सप क्रमांकाची व्यवस्था करा- डॉ.गोऱ्हे



**पुणे, दि.८- नंदुरबार जिल्ह्यात अल्पवयीन मुलांशी संबंधित आक्षेपार्ह व्हिडिओ आणि छायाचित्रे एका बावीस वर्षीय युवकाच्या मोबाईलमध्ये आढळल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात अनेक अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण झाल्याचा संशय असल्याने तपास केवळ एका आरोपीपुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण गुन्हेगारी साखळीचा शोध घ्यावा, अशी मागणी शिवसेना नेत्या, विधानपरिषद सदस्या आणि स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली आहे.**


पीडित मुले अल्पवयीन असल्याने त्यांची ओळख, छायाचित्रे, शाळा किंवा इतर वैयक्तिक माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवावी. त्यांचे जबाब पोक्सो कायद्यानुसार बालस्नेही वातावरणात, प्रशिक्षित समुपदेशकांच्या उपस्थितीत नोंदवावेत आणि आवश्यक असल्यास सुरक्षित वाहतुकीचीही व्यवस्था करावी, असे डॉ. गोऱ्हे यांनी म्हटले आहे. मोबाईल, व्हिडिओ, छायाचित्रे आणि अन्य डिजिटल पुराव्यांची सायबर तज्ज्ञांच्या मदतीने सखोल तपासणी करून इतर पीडित, आरोपी, मध्यस्थ किंवा सूत्रधारांचा शोध घ्यावा. तसेच सन ते या कालावधीत अशा प्रकारच्या घटना घडल्या आहेत का, याचाही तपास करावा, अशी मागणी त्यांनी केली. या प्रकरणासंदर्भात (पान ८ वर)

## चेतन कोळीला तिन दिवसांची पोलीस कोठडी

नंदुरबार, दि.८(प्रतिनिधी)- नंदुरबारमध्ये अल्पवयीन मुलांच्या लैंगिक शोषणाचे गंभीर प्रकरण समोर आले असून, या प्रकरणाने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. ५१ अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप संशयित चेतन कोळी याच्यावर करण्यात आला आहे.

पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला १२ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान पोलिसांच्या (पान ८ वर)

# सोनगीर परिसरात शेळ्या-मेंढ्यांच्या चोरीचे सत्र सुरूच सलग दुसऱ्या दिवशीही माळीच गावातून शेळ्या लंपास



**सोनगीर दि. ८(प्रतिनिधी)- सोनगीर आणि लगतच्या परिसर तसेच शिंदखेडा तालुक्यात शेळ्या-मेंढ्यांच्या चोरीचे सत्र अविरत सुरू असून, चोरट्यांनी सलग दुसऱ्या दिवशी आपली मुजोरी कायम ठेवली आहे. गुरुवारी झालेल्या चोरीच्या घटनेची शाई वाळते न वाळते तोच, शुक्रवारी रात्री शिंदखेडा तालुक्यातील माळीच येथील एका अपंग अल्पभूधारक शेतकऱ्याच्या बंदिस्त शेडमधून चोरट्यांनी सुमारे ३० शेळ्या चोरून नेल्या. या लागोपाठ घडणाऱ्या घटनांमुळे संपूर्ण परिसरातील पशुपालकांमध्ये घबराट व भीतीचे वातावरण पसरले आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री सोनगीर गावाजवळील (पान ८ वर)

## चिराग गल्लीतील छतावर सात तलवारी आढळल्या

नंदुरबार,दि.८(प्रतिनिधी)- नंदुरबार शहरातील चिराग गल्ली परिसरात अवैधरित्या धारदार तलवारी बाळगणाऱ्या इसमावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली. या कारवाईत ७ लोखंडी धारदार तलवारी जप्त करण्यात आल्या असून, त्यांची अंदाजे किंमत २४,००० असल्याचे पोलिसांनी सांगितले.

अदनान खान सफदन खान पठाण (वय ३०, रा. चिराग गल्ली, नंदुरबार) असे कारवाई करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. दि. ०७ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ७ वाजता त्याच्या राहत्या घराच्या छतावर, (पान ८ वर)

# सौ.विमलादेवी ओमप्रकाश अग्रवाल रुग्णालयाचे मंत्री ना.जयकुमार रावलांच्या हस्ते आज लोकार्पण



**धुळे, दि.८- येथील महापालिका आणि आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या संकल्पनेतील एबी फाउंडेशन संचलित (स्व.) सौ. विमलादेवी ओमप्रकाश अग्रवाल या मल्टिस्पेशालिटी धर्मादाय रुग्णालयाचे आज दि,९ ऑगस्ट रोजी दुपारी चारला जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते लोकार्पण होत आहे. शहरात प्रथमच या अत्याधुनिक सुविधांनी सज्ज रुग्णालयात धुळेकरांना उत्तम आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे.**

आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या रुग्णालयाच्या उद्याच्या लोकार्पणप्रसंगी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, महापालिका आयुक्त नितीन कापडणीस, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सका पाटील, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, महापालिकेतील भाजपच्या गटनेत्या किरण कुलेवार, स्थायी समितीच्या सभापती लताबाई सोनार, (पान ८ वर)

## प्रतापपुर दुकान फोडले रोकड चोरली; साहित्य जाळले

नंदुरबार, दि.८(प्रतिनिधी)- प्रतापपुर येथे अज्ञात चोरट्याने कटलरी दुकानाचे शटरचे कुलूप उघडून दुकानात प्रवेश करत काउंटरच्या गल्ल्यात ठेवलेली १ लाख २० हजार रुपयांची रोकड चोरून नेली. त्यानंतर दुकानातील साहित्याला आग लावून सुमारे ५० हजार रुपयांचे साहित्य जाळून नुकसान केल्याची घटना घडली.

मृणाल संजय निकम (वय २७, व्यवसाय कटलरी दुकान, रा. प्रतापपुर, ता. तळोदा, जि. नंदुरबार) यांनी याबाबत पोलिसांत फिर्याद दिली आहे. दिनांक ५ ऑगस्ट रोजी रात्री ८ ते ६ रोजी पहाटे ०४.०० (पान ८ वर)



# शहाद्यात मोकाट गुरांचा प्रश्न ऐरणीवर न.पा. च्या दुर्लक्षामुळे नागरिक हैराण

**शहादा,दि.०८(का.प्र.)- शहादा शहरातील मुख्य रस्त्यांसह गल्लीबोळात सध्या मोकाट गुरांचा वावर प्रचंड वाढला असून नगरपालिकेच्या दुर्लक्षित धोरणामुळे शहरवासीयांच्या जीविताचा प्रश्न निर्माण झाला आहे. मोकाट जनावरांच्या वाढत्या संख्येमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून पालिका प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली जात आहे.**

शहरातील मध्यवर्ती बस स्थानक परिसर, नगरपालिका परिसर, स्टेट बँक चौक, कुकडेल आणि जुना खेतिया रस्ता यांसारख्या प्रमुख भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर मोकाट जनावरे ठाण मांडून बसलेली असतात. बाजारपेठेत मोकाटपणे फिरणाऱ्या या जनावरांच्या झुंडींमुळे व्यापाऱ्यांना व ग्राहकांना प्रचंड नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावरून जाणाऱ्या दुचाकीस्वारांना तसेच पादचाऱ्यांना या गुरांमुळे अपघातांना सामोरे जावे लागत आहे.या मोकाट जनावरांचे मालक कोण आहेत, याचा शोध पालिका प्रशासनाने घेणे आवश्यक झाले आहे. पूर्वी शहरात फिरणाऱ्या मोकाट जनावरांना पकडून कोंडवाड्यात टाकले जात असे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून पालिका क्षेत्रातील कोंडवाडेच बंद किंवा नष्ट झाले असल्याचे चित्र आहे. प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नसल्यामुळे जनावरांचे मालक निर्धास्तपणे आपल्या गुरांना रस्त्यावर सोडून देत आहेत.नगरपालिका प्रशासनाने नागरिकांच्या जीविताची काळजी घेत या समस्येवर तोडगा काढण्यासाठी स्वतंत्र विभाग निर्माण करावा आणि निष्काळजी जनावर मालकांवर कडक कारवाई करावी. पालिका पदाधिकारी आणि प्रशासनाने या गंभीर विषयाची त्वरित दखल घेऊन उपाययोजना करावी, जेणेकरून संभाव्य अपघात टळून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळेल, अशी तीव्र प्रतिक्रिया शहरवासीयांकडून व्यक्त होत आहे.

## छ.शिवाजी महाराज स्मारक काँक्रिटीकरणास सुरूवात

धुळे, दि.८- शहरातील श्रीराम पेट्रोल पंपाजवळील शिवस्मारकालगतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याच्या कामास अखेर सुरवात झाली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून हा रस्ता खड्डेमय बनल्याने अपघाताला निमंत्रण मिळत होते.

शहराचे आमदार अनुप अग्रवाल व महापौर मायादेवी परदेशी यांच्या प्रयतकातून या कामाला आज सकाळी सुरवात करण्यात आली. या कामासाठी नगरसेवक कल्पना महाले, अॅड. रोहित चांदोडे, चेतन गवळी यांनी पाठपुरावा सुरु ठेवला होता. याबाबत नगरसेवक अॅड. चांदोडे म्हणाले की, गेल्या तीन महिन्यांपासून या रस्त्याचे काम रखडले होते. आज या रस्त्याच्या कामाला सुरवात झाली

आहे. शहरात मलनिस्सारण योजनेचे काम सुरु असल्याने तसेच वाहतुकीची समस्या असल्याने या कामासाठी थोडा विलंब झाला. सदर (पान ८ वर)

# शहरात नऊ दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत अनेक भागांना टँकरचा आधार- आलोक रघुवंशी




**धुळे, दि.८- धुळे शहरातून वाहणारी पांझरा नदी गेल्या काही दिवसांपासून दोन्ही काठ वाहत असताना,दुसरीकडे धुळे शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टंचाईचा सामना करावा लागत आहे. शहरातील काही भागांत गेल्या आठ ते नऊ दिवसांपासून नियमित पाणीपुरवठा झालेला नसून नागरिकांना टँकरद्वारे पाणी घेण्याची वेळ आली आहे. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाच्या पाणीपुरवठा नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.याबाबत काँग्रेस सेवादलाचे जिल्हाध्यक्ष आलोक रघुवंशी यांनी महानगरपालिका प्रशासन आणि सत्ताधारी लोकप्रतिनिधींना जाब विचारला आहे.**

रघुवंशी यांनी म्हटले आहे की,एकीकडे धुळे शहरातून पांझरा नदी दुथडी भरून वाहत आहे आणि दुसरीकडे धुळेकरांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची वाट पाहावी लागत आहे.ही परिस्थिती अत्यंत दुर्दैवी आहे.शहरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करणे ही महानगरपालिका (पान ८ वर)

## खराब वाल्व्हमुळे पाणीपुरवठा विस्कळीत

धुळे, दि.८- अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिनीवरील वाल्व्ह गुरुवारी (दि.६) रात्री नादुरुस्त झाल्यामुळे ही योजना पूर्णपणे बंद पडली आहे. परिणामी, धुळे शहरातील पाणीपुरवठा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाला आहे.

तसेच तापी नदीला आलेल्या पुरामुळे पाण्यात गाळ मिसळला असून जलशुद्धीकरण प्रक्रियेत अडचणी निर्माण होत आहेत. यामुळे तापी पाणीपुरवठा योजनेद्वारेही अल्प प्रमाणात आणि विलंबाने पाणीपुरवठा होत आहे. (पान ८ वर)



# कॅ.दामलेंच्या वाढदिवसानिमित्त महिलांना शिलाई मशिनचे वितरण

**धुळे, दि.८- शहरातील ब्राह्मण समाजातील गरजू महिलांना आर्थिक सक्षमीकरणासाठी शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. देवपूरातील मनकर्णिका भवनात झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सदर महिलांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले.**

परशुराम युवा मंच व सखी मंचातर्फे हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांच्या वाढदिवसानिमित्त मंचाचे अध्यक्ष भूषण जोशी यांच्या संकल्पनेतून कार्यक्रम घेण्यात आला. महिलांना रोजगाराची संधी मिळावी,त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होता यावे व कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीस हातभार लागावा यासाठी कार्यक्रमाचे आयाजेन केले गेले. याप्रसंगी अॅड. आर. डी.जोशी, नाना शुक्ल, मांडवेकर गुरूजी, विजय पाच्छापूरकर, शेखर कुलकर्णी, तळईकर गुरूजी, सखी मंचाच्या अध्यक्षा भारती जोशी, अनिल दिक्षित, आनंद कुलकर्णी, दिनेश कुलकर्णी आदीच्या हस्ते सदर महिलांना शिलाई मशिन वाटप करण्यात आले. याप्रसंगी मान्यवरांकडून या उपक्रमाचे कौतुक केले गेले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसांती दिक्षित यांनी केले. तर आभारप्रदर्शन रेखा कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमासाठी परशुराम युवा मंचाचे पदाधिकारी, सखी मंचाच्या पदाधिकारी यांच्यासह समाजबांधवांची उपस्थिती होती. आयोजनासाठी रेखा कुलकर्णी, अश्विनी जोशी, उर्मिशा चंद्रात्रे, सुषमा मोतीवाले, भावना शेंद्रे, वैशाली जोशी, कल्याणी जोशी, पल्लवी पुराणिक जागृती पंचभाई,, वासंती दिक्षित, हर्षा कुलकर्णी, स्वाती राव, कल्याणी पंचभाई आदींने सहकार्य केले. याप्रसंगी अश्विनी (पान ८ वर)

# धुळ्यात १० ऑगस्टला रास्ता रोको जेल भरो;अनेक संघटनांचा सहभाग

**धुळे, दि.८- कामगार आणि कर्मचारी विरोधी धोरणांविरोधात विविध संघटनांच्या वतीने सोमवार, दि.१० ऑगस्ट २०२६ रोजी धुळ्यात देशव्यापी रास्ता रोको आणि जेल भरो आंदोलन केले जाणार आहे. धुळे येथील संतोषी माता चौक येथे सकाळी ११ वाजता हे आंदोलन होणार असून, यात शेतकरी देखील मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. लोकशाही व शांततापूर्ण पद्धतीने हे आंदोलन केले जाईल, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.**

या देशव्यापी आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आणि यशस्वीतेसाठी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कंबर कसली आहे. यामध्ये प्रामुख्याने कॉम. एल. आर. राव, कॉम. दिपक सोनवणे, कॉम. शरद पाटील, कॉम. राजेंद्र चौरे, कॉम. आसिफ शेख, कॉम. किरण डमढेरे, कॉम. अॅड. अरुण ढिवरे, कॉम. ममता पाडवी, कॉम. लक्ष्मी पाडवी, कॉम. कुमोदिनी कुवर, कॉम. अशोक थोरात, कॉम. सचिन पारोळेकर, कॉम. योगेश्वर माळी, कॉम. अमोल निशाणे, कॉम. राजेश कुलकर्णी, कॉम. प्रदिप बडगुजर, कॉम. नाजमीन पिंजारी, कॉम. रतका शिंदे, कॉम. मिनाक्षी सोनवणे, कॉम. सीमा पाटील, कॉम. कविता अधिक, कॉम. शंकर जाधव, कॉम. भरत पाटील आणि कॉम. (पान ८ वर)

# शांतीनाथ नगर, अजबे नगरात चोरट्यांचा उच्छाद दागिने व रोकड लंपास; अल्पवयीन मुलीस धमकावले

**धुळे, दि.८ (प्रतिनिधी) - : शहरातील साक्री रोड परिसरातील शांतीनाथनगर व अजबेनगर भागात अज्ञात चोरट्यांनी धाडसी घरफोड्या करून सोन्या-चांदीचे दागिने, रोकड, असा लाखो रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना आज सकाळी (दि. ८) उघडकीस आली. विशेष म्हणजे, प्राध्यापकाच्या घरात चोरटे शिरले त्यावेळी त्यांची बारा वर्षीय मुलगी घरात एकटी होती. चोरट्यांनी तिला हिंदीत धमकावत सो जा, असे सांगितले आणि अवघ्या तीन ते चार मिनिटांत चोरी करून पोबारा केला. या संपूर्ण प्रकाराचे काही हालचाली सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्या आहेत.**


साक्री रोड परिसरातील अजबेनगर, प्लॉट क्रमांक साठ येथे प्राध्यापक मनोज मोहनलाल शर्मा हे कुटुंबासह राहतात. शुक्रवारी पहाटे सुमारे पाच वाजून चाळीस मिनिटांनी ते पतकीला जे.बी. रोडवर सोडण्यासाठी घराबाहेर पडले होते. त्यांची बारा वर्षीय मुलगी घरातच होती. दरम्यान, प्राध्यापक शर्मा सुमारे पाच वाजून पंचावन्न वाजता



घरी परतले असता त्यांना घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले. घरात प्रवेश केल्यानंतर मुलगी घाबरलेल्या अवस्थेत आढळून आली. मुलीने दिलेल्या माहितीनुसार, तीन ते चार चोरटे घरात शिरले होते. त्यांनी तिला धमकावत सो जा, असे हिंदीत सांगितले. त्यानंतर बेडरूमचा दरवाजा उघडून कपाटातील दागिने व इतर ऐवज काढून घेतला. चोरटे जात असताना आपसात मराठीत बोलत असल्याचेही मुलीने सांगितले. चोरट्यांनी मुख्य दरवाजाचे कुलूप तसेच आतील दरवाज्याचे स्विच लॉक तोडले. कपाटातील सुमारे दोन तोळे सोन्याचे दागिने, एक तोळ्याची मंगळपोत, कानातील तीन जोड तसेच चांदीचे लक्ष्मीचे शिक्के, असा ऐवज चोरून नेला. चांदीचे शिक्के ठेवलेल्या डब्यावर चांदीच्या मोठ्या व छोट्या लक्ष्मीच्या मूर्ती ठेवण्यात आल्या होत्या. या मूर्ती बनावट असल्याचा संशय आल्याने चोरट्यांनी त्या तिथेच सोडून केवळ चांदीचे शिक्के लंपास केल्याचे समोर आले.

प्राध्यापक शर्मा यांच्या पतकीने दिलेल्या माहितीनुसार, त्या घरातून बाहेर पडत असताना त्यांच्या घरासमोर एक इको गाडी उभी होती. त्यात तीन ते चार जण बसलेले दिसले. शर्मा दाम्पत्य घराबाहेर पडल्यानंतर ही गाडी काही अंतर पुढे गेली आणि पुन्हा घराच्या दिशेने परत आली. त्यानंतर घरफोडी झाल्याने या गाडीतील व्यक्तींवर संशय व्यक्त करण्यात आला आहे. घरासमोरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये चोरट्यांच्या हालचाली (पान ८ वर)


## एक शाम किशोरकुमार के नाम कार्यक्रम आज



धुळे दि.८: सदाबहार पार्श्वगायक किशोर कुमार यांच्या जयंतीनिमित्त एक शाम किशोर कुमार के नाम या विशेष संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता छत्रपती राजर्षी शाहू महाराज नाट्यगृह, धुळे येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमात किशोर कुमार यांनी अजरामर केलेल्या सदाबहार गीतांचा सुरेल नजराणा सादर करण्यात येणार असून, सुप्रसिद्ध गायक सुरेश चत्रे आणि गायिका डॉ. सौ. गायत्री चव्हाण आपल्या सुमधुर आवाजातून ही गीते रसिकांसमोर सादर करणार आहेत.या कार्यक्रमाचे निमंत्रक जगदीश देवपूरकर, संकल्पना पारिजात चव्हाण यांची असून, कार्यक्रमाचे निवेदन सय्यद वाहिद अली करणार आहेत. हा कार्यक्रम सर्व रसिकांसाठी विनामूल्य असून, धुळेकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संगीतमय पर्वाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.


दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,37,400 रु.+3% GST
सोने- 24 K -1,50,000 रु.+3% GST
चांदी- 2,37,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



खान्देशांतील संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सेनानी
साथी बी. सी. महाले

यांच्या ०९ ऑगस्ट क्रांतीदिन
जन्म जयंती निम्मित आदरपूर्वक आदरांजली.
श्री. संजय भटू महाले (मुलगा)
श्री. विजय भटू महाले (मुलगा)
सेनाजी नागरी सहकारी पत. मर्यादित
संत सेना नगर, देवपूर, धुळे
राष्ट्र सेवादल परिवार, धुळे
वाघाडी बु. तालुका शिंदखेडा ग्रामस्थ




# शहाद्यातील मुख्य रस्त्यांच्या दुरुस्तीस सुरूवात नगराध्यक्षांनी अधिकाऱ्यांसमवेत केली पाहणी

**शहादा,दि.८ (प्रतिनिधी)- शहरातील मुख्य रस्त्यांची झालेली दुरवस्था लक्षात घेऊन शहादा नगरपालिकेतर्फे रस्त्यांच्या दुरुस्ती कामास सुरुवात केली असून याचाच एक भाग म्हणून सप्तशृंगी मंदिर ते प्रकाशा रस्त्याला जोडणाऱ्या या प्रमुख रस्त्याचे पीसीसी ट्रीटमेंट करून रस्ता दुरुस्त करण्यात येत आहे. बुधवारी लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी पालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत रस्त्याची पाहणी करून कामाच्या दर्जाबाबत अधिकाऱ्यांना सूचना केल्या.**



शहरातील मुख्य रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर वाताहात झाली आहे. पालिकेतर्फे मुख्य रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले असून, सप्तशृंगी माता मंदिर ते प्रकाशा रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्यावर खड्ड्यांमध्ये पीसीसी ट्रीटमेंट करून पॅचवर्क केले जात आहे.

या कामाची शहराचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील, मुख्याधिकारी साजिद पिंजारी तसेच पालिकेच्या बांधकाम विभागाचे इंजि.श्री सूर्यवंशी, अधिकारी व कर्मचारी यांनी पाहणी केली. शहरातील प्रमुख मार्गांवरील मोठे खड्डे पीसीसी ट्रीटमेंटद्वारे भरून रस्ते वाहतुकीयोग्य करण्याचा प्रयतक सुरू असल्याचे यावेळी श्री पाटील यांनी सांगितले.

रस्त्यांच्या दुरुस्ती कामामुळे काही ठिकाणी वाहतुकीस तात्पुरता अडथळा निर्माण होऊ शकतो. मात्र नागरिकांचा त्रास कमी करण्यासाठी कामे नियोजनबद्ध पद्धतीने केली जात असल्याचे नगराध्यक्ष श्री पाटील यांनी स्पष्ट केले. याशिवाय शहरातील मुख्य रस्त्यांच्या कायमस्वरूपी दुरुस्तीसाठी सुमारे अकरा कोटी रुपयांच्या विकासकामांचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आला असून, तो लवकरच मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. नगरपालिकेच्या माध्यमातून सर्व नगरसेवक, सभापती, उपनगराध्यक्ष आणि आमदार यांच्या सहकार्याने शहरातील सर्व रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी प्रयतक सुरू असल्याचेही नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी सांगितले.

शहराच्या विकासकामे करतेवेळी वाहतुकीच्या मार्गात बदल करावा लागतो. गैरसोय होते यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# डॉ.एस.डी.शिंदखेडकरांना उत्कृष्ट संशोधन पुरस्कार



शहादा,दि.८ (का.प्र.) - येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. डी. शिंदखेडकर यांना सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा महाविद्यालयीन शिक्षकांसाठीचा प्रतिष्ठित मसंशोधन पुरस्कारफ घोषित करण्यात आला आहे.

विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालयीन प्राध्यापकांनी वर्षभरात केलेल्या उत्कृष्ट संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या संशोधनात्मक योगदानाचा गौरव करण्यासाठी हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो.

डॉ. शिंदखेडकर यांनी इंग्रजी भाषा आणि साहित्यामध्ये भरीव संशोधन केले असून, त्यांची अनेक पुस्तके तसेच आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील नामांकित शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत.

त्यांच्या याच उत्कृष्ट संशोधनात्मक लेखनाची आणि शैक्षणिक योगदानाची दखल घेऊन विद्यापीठाने त्यांना या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

डॉ. शिंदखेडकर यांना मिळालेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बापूसाहेब दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, समन्वयक प्रा.मकरंद पाटील, संचालक मयूरभाई पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. के. पटेल, तसेच सर्व सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील शैक्षणिक व संशोधनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयीन व शैक्षणिक वर्तुळातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.



# रेशन दुकानांमधून निकृष्ट धान्य पुरवठा उबाठाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

**नंदुरबार, दि.८(प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्ह्यातील रेशन दुकानांमार्फत निकृष्ट दर्जाचे धान्य पुरवले जात असल्याचा गंभीर आरोप करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत निकृष्ट पुरवले जाणारे गहू,तांदूळ ,मकई व ईतर धान्य जिल्हाधिकारी समोर ठेवत चांगले धान्य पुरवण्याची मागणी केली.**

निकृष्ट धान्य खाल्यामुळे गरीब, आदिवासी नागरिक मोठ्या प्रमाणात आजारी पडत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच प्रत्येक नागरिकाला देण्यात येणारे ५ किलो धान्य ऐवजी ३ ते ४ किलोच धान्य दिले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख पंडित माळी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी आशा सिंघवी याची भेट घेतली.

पुरवठा विभागाकडूनच कचरा, कीड, ओलावा आणि दुर्गंधीयुक्त धान्य रेशन दुकानदारांना दिले जात आहे. जनावरही खाणार नाही असे धान्य नागरिकांना दिले जात आहे असा आरोप त्यांनी केला, हे धान्य खाल्ल्याने कष्टकरी कुटुंबातील नागरिक आजारी पडत आहेत. दवाखान्याचा खर्चही त्यांना परवडत नसल्याचे त्यांनी सांगितले. पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराकडून रेशन दुकानदारांना प्रत्येक कट्ट्यामागे ५ किलो धान्य कमी दिले जात आहे. त्यामुळे दुकानदारांनाही नागरिकांना ५ किलोऐवजी ३-४ किलो धान्य द्यावे लागत आहे.

या सर्व प्रकाराला जिल्हा पुरवठा अधिकारी, सर्व तालुक्याचे तहसीलदार, तालुका पुरवठा अधिकारी आणि ठेकेदार जबाबदार आहेत. त्यांच्यावर कठोर व कायदेशीर कारवाई करून गुन्हे दाखल करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)पक्षाने केली आहे.

जर याप्रकरणी तातडीने दखल घेऊन योग्य कारवाई झाली नाही, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हयात रास्तारोको आंदोलन छेडण्यात येईल आणि याला जिल्हा प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी जिल्हाप्रमुख पंडित माळी महिला आघाडीचा जिल्हाप्रमुख रीना पाडवी, उपजिल्हाप्रमुख डॉ हेमंत शर्मा,जिल्हा सचिव दिनेश सोनवणे, तालुकाप्रमुख रमेश पाटील, व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष बापू महाजन,किसान सेना जिल्हाध्यक्ष बापू राजपूत,युवा सेना उपजिल्हाधिकारी दिनेश भोपे, महिला आघाडीच्या चारू बागुल,भक्तवत्सलसोनार,इम्तियाज आकाश वळवी, अभेसिंग वळवी व शिवसैनिक उपस्थित होते.

सध्या जिल्ह्यात मोफत रेशन वाटप सुरू असताना धान्याच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आल्याने प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आत्मबोध व जीवन कल्याणासाठी गुरुची आवश्यकता - स्वामी शिवानंद दादाजी

**पिंपळनेर, दि.८ (प्रतिनिधी)- मानवी जीवनात आत्मज्ञान,आत्मबोध आणि जीवनाचे खरे कल्याण साध्य करण्यासाठी सदगुरुंचे मार्गदर्शन अत्यावश्यक आहे. मनातील विकारांचा त्याग करून मन शून्य केले तर आत्मज्ञानाचा मार्ग खुला होतो. अनुभूतीचा साक्षात्कार करून देणारा खरा गुरु असतो,प्रतिपादन परमपूज्य ओम श्री स्वामी शिवानंद दादाजी महाराज यांनी गुरुपौर्णिमा महोत्सवानिमित्त आयोजित प्रवचनात केले.**



येथील विश्वात्मक ओम शिवानंद दादाजी परिवार प्रतिष्ठान यांच्या वतीने गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.दिवसभर नामदान,गुरुनाम संकीर्तन, ध्यान-धारणा, भावगीत,भक्तीगीत आदी धार्मिक कार्यक्रम पार पडले. शेकडो भाविकांच्या उपस्थितीत झालेल्या प्रवचनात स्वामीजींनी आत्मबोध,ध्यान आणि गुरुतात्वाचे महत्व विशद केले.

स्वामीजी म्हणाले, ज्याचा शोध तुम्ही बाहेर घेत आहात तो परमात्मा तुमच्याच अंतःकरणात आहे. त्याची अनुभूती करून देणारा गुरूच खरा जीवनमार्गदर्शक आहे. विकामुस जीवन,सत्कर्म आणि ध्यानधारणा यांदारे आत्मज्ञान प्राप्त होते,असेही त्यांनी सांगितले. महोत्सवास पिंपळनेर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा डॉ. योगिता चोरे,डॉ. जितेश चौरे, सभापती राजेंद्र शिरसाठ,विनोद कोठावदे,नगरसेवक विजय गांगुर्डे,ज्ञानेश्वर एखंडे,संभाजी अहिरराव,प्रशांत सूर्यवंशी,रेखा सूर्यवंशी,पांडुरंग सुर्यवंशी,किशोर बधान,प्रा. डी. टी.पाटील,राजेंद्र गवळी,अंबादास बेनुस्कर,किशोर बंधात,सतिष पाटील,सुभाष जगताप, मुख्याध्यापक रवींद्र जे.पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी शिष्यांच्या हस्ते स्वामीजींचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.विनायक जोशी,प्रा.डॉ. श्रीमती जोशी,प्रा. डी.टी.पाटील व राजेंद्र गवळी यांनी मनोगत व्यक्त केले.

आध्यात्मिक कार्याचा विस्तार, मेडिटेशन, समाजसेवा,प्रेम, कर्तव्य व लोककल्याण या पंचसूत्रीवर आधारित समित्या स्थापन करण्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.

सायंकाळी स्वामी शिवानंद दादाजी महाराजांची शहरातील प्रमुख मार्गावरून सवाद्य भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत दोन हजारांहून अधिक शिष्य व भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद शिंदे यांनी केले.

# ॲड. किर्ती शार्दुल यांची महिला संघटकपदी नियुक्ती

धुळे, दि.८- धुळे येथील रहिवासी तथा धुळे जिल्हा शिवसेना प्रमुख बापूदादा शार्दुल यांची सुकन्या ॲड. किर्ती शार्दुल यांची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या धुळे जिल्हा महिला संघटकपदी नियुक्ती झाली आहे. ॲड. किर्ती शार्दुल या गेल्या पंचवीस वर्षांपासून वकील व नोटरी म्हणून धुळे, नवी मुंबई व ठाणे येथे कार्यरत आहेत. त्यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या विधी विभागाशी संलग्न असलेल्या शिवविधी न्याय सेना मध्ये काम केले आहे. सध्या त्या शिवविधी न्याय सेना, ऐरोली, नवी मुंबईच्या उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.


# देवरे अभि.तील आर एस व्ही सी केंद्राला नाबार्डचे अभिजित रांजणकर यांची भेट



धुळे,दि.८- श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयातील रुटैग स्मार्ट व्हिलेज सेंटर (आर एस व्ही सी ) केंद्रास नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक अभिजित रांजणकर यांनी नुकतीच भेट दिली व केंद्रामध्ये विकसित व कार्यान्वित करण्यात आलेल्या विविध नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाची पाहणी केली.

या केंद्रात ग्रामीण भागातील शेतकरी, कारागीर व ग्रामीण उद्योजकांसाठी कमी खर्चातील, ऊर्जा कार्यक्षम, पर्यावरणपूरक आणि शाश्वत तंत्रज्ञानाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने आर एस व्ही सी केंद्रामार्फत विविध तंत्रज्ञान विकसित व प्रात्यक्षिक स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आले आहे. केंद्रातील प्रमुख उपक्रमांमध्ये एक टन क्षमतेचे मोठ्या आकाराचे अर्धगोलाकार हेमीस्फेरीकल सोलर ड्रायर सौर वाळवणी यंत्र हा प्रमुख प्रकल्प आहे. कृषी व अन्नप्रक्रिया उत्पादनांचे सौरऊर्जेच्या माध्यमातून वाळवण करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग होतो. तसेच शाश्वत वायुवीजन (सस्टेनेबल व्हेंटीलेशन) प्रणाली, सौरबोगदा वाळवणी यंत्रासह लाकूड सिझनिंग व सरळीकरण यांसारख्या तंत्रज्ञानाचीही केंद्रात उभारणी करण्यात आली आहे. याशिवाय, नैसर्गिक शीतकरणाच्या तत्त्वावर आधारित मातीच्या मडक्यापासून तयार करण्यात आलेले शीतगृह व पिण्याच्या पाण्याचे शीतकरण यंत्र हे पर्यावरणपूरक व कमी खर्चाचे तंत्रज्ञानही केंद्रात कार्यान्वित करण्यात आले आहे.ग्रामीण भागात कमी ऊर्जा वापरून पाणी उपसा करण्याच्या उद्देशाने सायकलवर चालणारा पंप देखील आर एस व्ही सी केंद्रात प्रायोगिक स्वरूपात कार्यान्वित करण्यातआला आहे. मानवी श्रमशक्तीचा वापर करून पाणी उपसा करणारे हे तंत्रज्ञान ग्रामीण भागासाठी उपयुक्त ठरू शकते. या भेटीदरम्यान मा श्री अभिजित रांजणकर यांनी केंद्रातील विविध तंत्रज्ञानाची सविस्तर पाहणी केली. त्यांनी या तंत्रज्ञानाची उपयुक्तता, ग्रामीण भागातील प्रत्यक्ष वापर, शेतकरी व ग्रामीण उद्योजकांसाठी असलेली क्षमता तसेचमोठ्या प्रमाणावर प्रसार करण्याच्या शक्यता याबाबत आर एस व्ही सी केंद्राच्या टीमशी चर्चा केली. ग्रामीण विकास, शाश्वत ऊर्जा, कृषी प्रक्रिया आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने आर एस व्ही सी केंद्रामार्फत करण्यात येतअसलेल्या प्रयतकांचे त्यांनी कौतुक केले. या तंत्रज्ञानाचा ग्रामीण भागात व्यापक प्रसार करण्यासाठी भविष्यातील सहकार्याच्या विविध शक्यतांवरही यावेळी चर्चा झाली.या भेटीमुळे नाबार्ड आणि आर एस व्ही सी केंद्र यांच्यातील ग्रामीण तंत्रज्ञान प्रसार व ग्रामीण उद्योजकता विकासा साठीच्या सहकार्याला नवी दिशा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा बाबासाहेब कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे, उद्योजक विलास देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात नुकतेच आर एस व्ही सी केंद्राचे लोकार्पण झाले आहे. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालया तर्फे आर एस व्ही सी केंद्राच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ हितेंद्र पाटील यांनी अभिजित रांजणकर यांचे स्वागत करून आभार मानले, आर एस व्ही सी केंद्र प्रमुख व मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.डॉ. एस डी सूर्यवंशी, रजिस्ट्रार प्रा मोहन पवार उपस्थित होते.

## प्रकाश में आज बेगाना




धर्मेन्द्र रति अग्नीहोत्री, अमरिशपुरी कुमार गौरव ओम शिवपुरी


## निधन वार्ता

### प्रमिलाबाई अग्रवाल



धुळे, दि.८- शहरातील अग्रवाल नगर, अभय नगर प्लॉट नं.२९ येथील रहिवासी प्रमिलाबाई गोविंदलाल अग्रवाल यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा आज दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता काढण्यात येणार आहे. त्या स्व.गोविंदलाल यांच्या धर्मपत्नी, श्रीकिसन, अशोक, प्रमोद, अनिल यांच्या काकू, डॉ.संजय यांच्या आजी, मनोज आणि डॉ.राजेश यांच्या मातोश्री तर अजय, जय यांच्या आजी होत.

### यशोदा विसपुते



धुळे, दि.८- शहरातील रेल्वे स्टेशन रोड राष्ट्रवादी भवन जवळील विशाल इस्टेट प्लॉट नं.६ अ येथील रहिवासी गं.भा.यशोदाबाई गोपीनाथ विसपुते यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यसमयी त्या ८१ वर्षांच्या होत्या. त्या ॲड.सुभाष विसपुते यांच्या मातोश्री होत.

### मधुकर अमृतकर



धुळे, दि.८- देवपूर परिसरातील लेवाभवन जवळील सत्संग कॉलनी प्लॉट नं.१२ येथील रहिवासी मधुकर बेनीराम सोनजे यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

### मथुराबाई शिंदे



धुळे, दि.८- बिलाडी ता.धुळे येथील मथुराबाई शेनपडू शिंदे यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८७ वर्षांच्या होत्या. त्यांची अंत्ययात्रा रविवार दि.९: ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता बिलाडी येथील राहत्या घरापासून काढण्यात येणार आहे. त्या संत रेवागीरी बाबा माध्य. विद्यालय धमाणे ता. धुळे येथील सेवानिवृत्त शिक्षक एस. एस. पाटील यांच्या मातोश्री होत.

# प्लॉट खरेदीत फसवणूक

धुळे, दि.८- प्लॉट खरेदीचे बनावट दस्तावेज बनवून शहरातील एकाची ७ लाखात फसवणूक करण्यात आली. शहरातील हबीब रहमान आतिक रहमान अन्सारी यांनी चाळीसगावरोड पोलिसात फिर्याद दिली, त्यानुसार अविष्कार कॉलनीतील एक प्लॉट खरेदी करून देण्याचे सांगितले. संशयित नईम अखतर मो. अन्सारी, नदीम अब्दुल हमीद अन्सारी, शराफत अली सईद अली सैय्यद, मुश्ताक जावीद अन्सारी, आबिद लतीफ अन्सारी यांनी हबीब अन्सारी यांच्याकडून खरेदीसाठी ७ लाख रुपये घेतले. बनावट उतारा व खोटे खरेदीखत तयार करून आर्थिक फसवणूक केली.










## शब्दकोडे क्रमांक : २४२९



**आडवे शब्द :** १.वेदना शमवणारे ५.काबाडकष्ट ८.चपाती भाजण्याचे साधन ९.विषम-विरुद्ध १०.धनी ११.आब १२.अंतर १३.धरणी १५.वर्ण १६.कृष्णवर्णीय १७.,अस्वल १८.आईचा भाऊ १९.राख २०.इंग्रजीत-पत्र २१.अनावश्यक २२.'बारा' नंतर येणारी संख्या २३.एक नक्षत्र २४.अनेक खोल्यांचे मोठे घर २५.वल्कल २७.१००० किलो २९.लहान टेकडी ३१.खून ३२.पाणी साठवण्याचा मोठा पिंप ३३.रेट-उलट लिहा ३४.भिस्त ३५.नाव ३७.इच्छा ३८.पिता ४०.बायका-पोरे नसलेला ४१.राजा ४३.वळवळ ४५.संगीत सप्तकातील सहावे स्वर ४६.स्पष्ट ४८.देश ५०.इंग्रजीत-नाही ५१.नाही-विरुद्ध ५२.वायू ५३.दरारा ५४. ऊन

**उभे शब्द :** १.पगार २.औषध ३.सरकार ४.मज ५.घरकाम करणारी स्त्री ६.इंग्रजीत-नशीब ७.इंग्रजी कालगणनेतील सहावा महिना १०.बेदम दिलेला चोप ११.पाठलाग १२.शाळेत बाई ज्यावर लिहितात तो १४.महाराष्ट्रातील एक देवस्थान '** शंकर' १५.गरीब १६.समय १८.भडीमार १९.सागराच्या पाण्याची चव २०.राजस्थानातील एक प्रांत २१.चीर २२.सूर्यफुलाच्या बियांपासून बनवतात ते २४.घटना २५.आराधना २६.चिंता २८.नाना पाटेकर अभिनित एक भारतीय सिनेमा ३०.गोंद ३६.चर्चा ३७.आशा ३९.तुकडी ४२.हवेतील थंडावा ४३.हड्डी ४४.वात्रट ४७.शेतात घातले जाणारे खाद ४९.आठ नंतर येणारी संख्या

### शब्दकोडे क्रमांक : २४२८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वी | ज | | वै | त | र | णा | | पि | ला | व | ळ |
| त | | क | | र | स | | ख | च | | ही | |
| | प | रा | ग | | ना | गा | | का | ठ | | वि |
| म | ल | म | | पु | | ज | ब | री | | खा | रा |
| जा | | त | र | का | री | | ट | | क | प | ट |
| | का | | त | र | | मी | | बे | जा | र | |
| ब | र | त | न | | घो | | अ | ल | ग | | वि |
| | वा | स | | व | | स | मा | न | | म | हा |
| आ | | बी | ट | | क | मा | न | | व | | र |
| स | मी | र | | सा | | न | त | म | स्त | क | |
| न | ल | | ना | व | ड | ता | | सू | रा | व | ट |
| | न | ट | | ज | ल | | मा | र | | ड | च |

रविवार ९ ऑगस्ट २०२६

आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.i







प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०

छत्रपतींचे गड-किल्ले म्हणजे आपल्या राष्ट्राची स्वतंत्र प्रतिके आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून रयतेच्या हितासाठी भक्कम किल्ले बांधून बलाढ्य स्वराज्य उभे केले. हे गड-किल्ले म्हणजे स्वराज्याचे वैभव असुन वैश्विक समृध्दीचे प्रतिक आहेत.महाराजांनी गड, कोट, दुर्गाच्या सहाय्याने स्वराज्य उभे केले.त्यासाठी नविन किल्ले बांधले व जुने दुरूस्त केले. स्वराज्य स्थापनेत गड-किल्ल्यांना महत्व प्राप्त करून दिले. त्यांच्या या आदर्श दुर्गनितीमुळे डोंगर द-यात वसलेल्या गड-किल्ल्यांना श्रेष्ठत्व प्राप्त झाले.महाराष्ट्र हा गड-किल्ल्यांचा देश आहे. याच गड-किल्ल्यांमुळे वैभवशाली इतिहास घडला आहे. सहयाद्रीच्या कुशीत वसलेले गड-किल्लूले शौर्याचे व पराक्रमाचे साक्षीदार आहेत.सहयाद्रीतील डोंगर- द-यावरील गड-किल्ले

# छत्रपती शिवाजी महाराजांचे गड-किल्ले वैश्विक समृध्दीचे प्रतिक



म्हणजे स्वराज्याची महान शिल्पे आहेत.छत्रपतींची अव्दितीयता व स्वराज्यातील भक्कमता किल्ल्यावरून दिसुन येते.छत्रपतींचे गड-किल्ले अखंड भारत देशासाठी आदर्श अशी स्मारके आहेत. ज्या गड-किल्ल्यांच्या सहाय्याने छत्रपतींनी जागतिक किर्तीचे शासन निर्माण केले. ते गड-किल्ले जागतिक वारसा स्थाळामध्ये समाविष्ट झाले आहेत. छत्रपतींच्या गौरवशाली इतिहासाचा हा सन्मान आहे. छत्रपतींच्या ऐतिहासिक वैभवाला अधोरेखीत करणारा हा क्षण आहे.

युनेस्कोच्या जागतिकवारसा यादीत महाराष्ट्रातील ११ व तामिळनाडूतील एक अशा १२ किल्ल्यांना मानांकन मिळाले.महाराष्ट्रातील रायगड, राजगड, पन्हाळा, प्रतापगड, शिवनेरी, साल्हेर, लोहगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खादेरी व जिंजी यांना जागतिक मान्यता मिळाली आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ मानांकनासाठी आवश्यक असलेल्या 'अव्दितीय वैश्विक मूल्य' या निकषांवर हे किल्ले श्रेष्ठ ठरले आहेत. हे किल्ले मराठा सत्तेच्या लष्करी शक्तीचे, बांधकाम कलेचे व रणनीतीचे एक श्रेष्ठ उदाहरण आहेत.हे किल्ले संरक्षणासाठी नव्हेतर धोरणात्मकदृष्ट्या ही वैशष्ट्यपूर्ण आहेत. छत्रपतींनी सहयाद्रिच्या घाटमाथ्यावर व सागरी किणारी भौगोलिक परिस्थितीचा उपयोग करून गड-किल्यांची उभारणी केली.छत्रपतीकालीन किल्ल्यांचे सामरिक स्थापत्य व स्वराज्य संकल्पना, सांस्कृतिक महत्व,सहयाद्रिच्या गड-किल्ल्यांवर साकारलेली माची हा स्थापत्यशास्त्रातील महत्वपूर्ण भाग आहे.गडाची माची म्हणजे युध्दकौशल्याचा व सुरक्षिततेचा महत्वपूर्ण घटक आहे. माची रचनेमुळे दरवाजे, बुरूज, तटबंदी, खंदक सुरक्षित केलेले आहेत. जगातील कोणत्याही किल्ल्याच्या रचनेमध्ये हे माची स्थापत्य दिसुन येत नाही.शत्रूला न दिसणा-या गोमुखी दरवाजाची वैशिष्ट्यपूर्ण रचना, स्थापत्यशैली, गनिमी काव्याचे युध्दतंत्र, मावळयांचा पराक्रम व शौर्य, अभियांत्रिकी कौशल्य हे सर्व घटक मानांकनाच्या निर्णयामध्ये निर्णायक ठरले आहेत.

राजकीय,लष्करी व सांस्कृतिक दृष्टीकोनातुन छत्रपतींचे गड-किल्ले वैशिष्टयपुर्ण राहिले आहेत. महाराजांनी उभा केलेल्या गड-किल्ल्यांचा ऐतिहासिक ठसा आता जागतिक स्तरावर अधोरेखित झाला आहे.स्वराज्याची राजधानी रायगड, स्वराज्याची पहिलीराजधानी राजगड, छत्रपतींनी ज्या किल्ल्यावर अफजलखानाला नेस्तनाभूत केले तो प्रतापगड, छत्रपतींचे जन्मस्थान शिवनेरी, स्वराज्याच्या नौदलाचे प्रमुख केंद्र सिंधुदुर्ग, पराक्रम, शौर्य आणि समुद्री सामर्थ्यांचा जिवंत साक्षीदार म्हणजे किल्ले विजयदुर्ग, समुद्रांच्या लाटांना समर्थपणे तोंड देत उभा असणारा खांदेरी, शत्रूच्या छातीत धडकी बसवणारा व सहयाद्रीच्या पर्वत रांगेतील सर्वात उंच किल्ला म्हणजे साल्हेर, इतिहास आणि सौदर्य यांचे अव्दितीय मिश्रण असणारा उंच डोंगरावर गर्वाने उभा असलेला लोहगड, दक्षिण भारतातील ग्रेटवॉलम्हणून ओळख असणारा तामिळनाडू राज्यातील जिंजी किल्ला या वैशिष्टयपूर्ण किल्ल्यांचा समावेशआहे.

छत्रपतींनी जे यश मिळविले ते दुर्गाच्या सानिध्यानेच मिळविले. बलाढ्य शत्रूवर जे विजय मिळविले ते ही दुर्गा मुळेच. स्वराज्याला जे वैभव प्राप्त झाले ते ही दुर्गामुळेच 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' या रामचंद्रपंत आमात्य यांच्या अज्ञापत्रामधील वाक्यातुन दुर्गाचे महत्व स्पष्ट झाले आहे. राजकीय, भौगोलिक व आर्थिकदृष्ट्या किल्ल्यांना महत्व आहे. नैसर्गिकदृष्ट्या सहयाद्रीतील पर्वत, टेकडया समृध्द असल्यामुळे छत्रपतींनी तेथे गड-किल्ले उभा केले. किल्ले उभारत असताना एक तत्व जोपासले. ज्या डोंगरावर किल्ला बांधावयाचे निश्चित केले आहे. त्या डोंगरांच्या घळी, उतार, कातळकडे, नाळ, पाण्याच्या वाटा यांचा पुरेपूर वापर करून किल्ले अभेद्य बनविले. गोमुखी किंवा एडक्याच्या शिंगासारख्या आकाराच्या दरवाजाची बांधणी हे या दुर्गबांधणीचे वैशिष्ट्य होय. छत्रपतींनी किल्ले बांधत असताना तेथील भूरचना व त्याचे संरक्षण या दृष्टीने विचार करून बलाढ्य अशा दुर्गाची निर्मिती केली.

गिरीदुर्ग, वनदुर्ग, भुईकोट, जलदुर्ग म्हणजे सागरी किणा-यावरचे किल्ले, बेटांवरचे जंजिरे म्हणजे पाणकोट असे विविध प्रकारचे किल्ले असलेला अवघा महाराष्ट्र हाच किल्ल्यांचे एक संग्रहालय आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची गाथा सांगत आजही हे किल्ले उभे आहेत. स्वराज्यातील गड-किल्ल्यांची संख्या चित्रगुप्त बखर- ३६१, चिटणीस वखर ३१७, सभासद बखर २४० छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युसमयी स्वराज्यात एकूण ३६० किल्ले होते. छत्रपतींनी उभे केलेले सर्वच गड-किल्ले लढाऊ केले आहेत. महाराष्ट्रात आहेत तसे आणि तितके जगात अन्यत्र कोठे असे बालुम दुर्ग नाहीत. डोंगर कड्यावर व सागरी किणा-यावर किल्ले बांधणे व त्याची व्यवस्था ठेवणे ते सुसज्ज करणे आणि ते अधिक बळकट करणे याकडे **(पान ४ वर)**

# भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ.एस.आर.रंगनाथन...



भाऊसाहेब देशमुख
९४२०३८९५४१

ग्रंथालय म्हणजे केवळ पुस्तकांचे गोदाम नव्हे; ते ज्ञानाचा श्वास घेणारे, समाजाला दिशा देणारे सजीव केंद्र आहे. या विचाराला आपल्या आयुष्याचे ध्येय बनवणारे महान ग्रंथालयतज्ज्ञ म्हणजे डॉ. शियाली रामामृत रंगनाथन.

९ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिन. हा दिवस भारतातील ग्रंथपाल आणि ज्ञानसेवकांसाठी आणि ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी प्रेरणेचा दिवस आहे.

९ ऑगस्ट १८९२ रोजी तामिळनाडूतील तंजावर जिल्ह्यातील गाव शियाली (सध्याचे सिरकाझी) येथे त्यांचा जन्म झाला. घरात धार्मिक वातावरण होते दक्षिण भारतात रंगनाथन या देवतेचे श्रेष्ठ स्थान आहे. त्यावरून या बालकाचे नाव रंगनाथन असे ठेवण्यात आले. त्यांच्या कुटुंबातील ते पहिले अपत्य होते.

रंगनाथन यांचे शालेय शिक्षण शियाळी या त्यांच्या गावीस पूर्ण झाले. बालपणापासून त्यांना अभ्यासात उत्तम गती होती. संस्कृत हा त्यांच्या आवडीचा विषय होता. एक उदाहरण त्यांच्या बुद्धिमत्तेचे वाचायला मिळते. त्या काळात विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेच्या चाचणीसाठी शिक्षक विद्यार्थ्यांना विशिष्ट विषयावर निबंध लिहून आणायला सांगत. त्यावरून विद्यार्थ्यांची भाषेची प्रगती पाहून त्यांना त्याचे मूल्यमापन करता यावे. अशा एका चाचणीच्या वेळी रंगनाथन यांनी निबंध लिहून आणला तो वाचून शिक्षक चकीत झाले. त्यांना शंका आली. इतक्या सुंदर रीतीने लिहिणे या बालकाला कसे शक्य.तेही संस्कृत मध्ये म्हणून त्यांनी चौकशी केली. तेव्हा रंगनाथन यांनी बाणेदारपणे हा निबंध मीच लिहिला आहे असे सांगितले आणि शिक्षकांना सांगितले, आपण मला कोणताही विषय द्या, मी त्यावर इथेच निबंध लिहून दाखवतो.

रंगनाथन याची परीक्षा घेण्याच्या उद्देशाने शिक्षकांनी त्याला लगेच एक विषय दिला आणि वर्गात बसून संस्कृत निबंध लिहायला सांगितले. काही वेळाने त्याने निबंध पूर्ण करून तो शिक्षकांच्या हाती दिला. शिक्षकाने तो निबंध वाचला. त्यांची खात्री झाली.रंगनाथनचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व पाहून त्यांनी त्याला शाबासकी दिली. त्याचा निबंध वर्गात वाचून दाखवला. त्यांच्या बुद्धीची आणि निर्भयतेची चमक बालपणीच दिसून आली. पुढे सन १९०८ मध्ये रंगनाथन यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाल्याने महाविद्यालय शिक्षण घेण्यासाठी ते चेन्नई येथे पोहोचले. त्या काळात हे शहर मद्रास नावाने ओळखले जात असे. मद्रास मधील प्रसिद्ध ख्रिश्चन महाविद्यालयात रंगनाथांना प्रवेश मिळाला. या महाविद्यालयात विद्वान प्राध्यापकांनी त्यांचे बौद्धिक पोषण केले. प्राध्यापकांची व्याख्याने ऐकून त्यांनी विचार केला की, आपले प्राध्यापक या ग्रंथाच्या आधारे आपल्याला शिकवतात त्या मूळ ग्रंथाचे आपण वाचन केले पाहिजे म्हणून त्यांनी ग्रंथालयात नियमित जाणे सुरू केले. तिथे ते तासंतास बसू लागले. इंग्रजी वाङ्मय हा विषय घेऊन त्यांनी बीए ची पदवी प्रथम श्रेणीमध्ये संपादन केली. त्यावेळी त्यांनी वाचलेल्या ग्रंथांचा त्यांना चांगला उपयोग झाला. पुढे ग्रंथालयात बसून जास्तीत जास्त वेळ वाचन करायचे आणि ग्रंथालयातील ग्रंथाशी एकरूप होण्याचे संस्कार त्यांच्यावर या काळातच झाले. पुढे एम ए चे शिक्षण घेताना त्यांनी इंग्रजी वाङ्मय ऐवजी गणितासारख्या अतिशय कठीण विषयाची निवड केली.

पुढे रंगनाथन यांनी तत्कालीन मद्रास सरकारच्या शिक्षण विभागात नोकरी मिळवली. सन १९१७ ते १९२० या काळात त्यांनी मद्रासच्या शासकीय महाविद्यालयात गणिताचे प्राध्यापक म्हणून कार्य केले. अध्ययन आणि अध्यापन या दोन्ही कामासाठी झोकून देऊन कार्य करण्याच्या स्वभावामुळे ते विद्यार्थ्यांमध्ये अतिशय प्रिय झाले. आपला प्रत्येक विद्यार्थी उत्तम प्रतीने उत्तीर्ण व्हावा यासाठी ते सतत कार्यरत राहिले. पुढे सन १९२० ते १९२३ या कालावधीत त्यांनी मद्रास येथील प्रेसिडेन्सी कॉलेजात अध्यापनाचे कार्य केले . गणितासारखा रुक्ष विषय ते अतिशय मनोरंजक पद्धतीने शिकवत असत. त्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात त्यांच्या प्रयत्नांनी गणित विषयावरचे उत्तम उत्तम ग्रंथ समाविष्ट झाले.त्या सर्व ग्रंथाचा त्यांनी सखोल अभ्यास केला. ग्रंथालयातील त्यांच्या स्वाभाविक रुचीमुळे त्यांनी ग्रंथालय चळवळीसाठी काम करायचे ठरवले.

मद्रास विद्यापीठात ग्रंथापालाची जागा रिकामी झाल्याचे त्यांना समजले . रंगनाथन यांना गुणवत्तेच्या आधारावरच ग्रंथपाल या पदावर नेमणूक मिळाली. त्यांची प्रखर बुद्धिमत्ता, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि प्रचंड आत्मविश्वास या सर्व गुणांच्या बळावर त्यांनी ग्रंथपाल या पदावर उत्तम पद्धतीने काम केले. ग्रंथालयाच्या कामकाजातील त्यांची रुची पाहून मद्रास विद्यापीठाने त्यांना लंडन येथील जागतिक कीर्तीच्या ब्रिटिश म्युझियम या विशाल ग्रंथालयातील कामकाजाच्या पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी पाठवले. आता जगातील सर्वोत्तम अशा ग्रंथालयात त्यांना ग्रंथालय शास्त्राचे सिद्धांतिक आणि व्यवहारिक ज्ञान उपलब्ध झाले. ग्रंथालयाच्या कामकाजाचा बारकाईने अभ्यास करून त्यांनी काही सुधारणा करण्याचे ठरवले. त्याकाळी इंग्लंड मध्ये सर्वप्रथम सार्वजनिक ग्रंथालय कायदा १८५० मध्ये अस्तित्वात आला होता. त्यात ग्रंथालयाचे कामकाजाची पद्धत निश्चित करण्यात आली होती. या सर्व कायद्याचा परिचय रंगनाथन यांनी करून घेतला. पुढे लंडन येथील विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लायब्ररी या संस्थेत त्यांनी प्रवेश घेतला. त्यावेळी ग्रंथालय शास्त्राचे शास्त्रशुद्ध शिक्षण देणारी ही तत्कालीन एकमेव जागतिक संस्था होती. परंतु या विद्यापीठाच्या ग्रंथालय शास्त्राच्या अभ्यासक्रमात ग्रंथालयाची संबंधित असलेल्या विषयांच्या समावेश नव्हता. इतर वाङ्मय यांच्या अध्ययनावर त्यांचा विशेष भर होता.

याच विद्यापीठात ग्रंथालय वर्गीकरण हा विषय शिकवणारे प्राध्यापक डब्लू. सी. वर्बिक सेअर्स यांच्याकडून त्यांना उचित मार्गदर्शन लाभले. त्यांचा सल्ला त्यांनी शिरोधार्य मानून लंडन शहरातील निरनिराळ्या सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्यपद्धतीची माहिती मिळवली आणि आपले ग्रंथालय शास्त्राचे ज्ञान अधिकाधिक अद्यावत केले. त्यासाठी क्रायटेन येथील सार्वजनिक ग्रंथालय त्यांनी स्वतः काम देखील केले . ज्ञानाच्या वर्गीकरणाच्या निर्णय पद्धतींचा रंगनाथन यांनी पद्धतशीर अभ्यास केला. त्यातून त्यांना आपण योग्य दिशेने वाटचाल करीत आहोत याची खात्री झाली. पुढे लंडनहुन परत येताना रंगनाथ यांना बोटीवरच ग्रंथालय शास्त्राचा पाया घालणाऱ्या द्विबिंदू वर्गीकरण पद्धतीचा आराखडा सुचला. पुढे इसवी सन १९२५ मध्ये मद्रासला परत आल्यावर त्यांनी द्वि बिंदू वर्गीकरण पद्धतीनुसार काम करायला सुरुवात केली. सुरुवातीला या पद्धतीची व्यवहार्यता स्वीकाराला अन्य लोकांनी नकार दिला.परंतु पुढे त्याची उपयुक्तता समजल्यावर ही पद्धत सर्वमान्य झाली.

ग्रंथालयाचा विकास या एकमेव उद्दिष्टाने झपाटलेले हे व्यक्तिमत्व पुढे ग्रंथालय शास्त्रावर विविध ठिकाणी व्याख्याने द्यायला लागले . या व्याख्यानातून अनेकांना प्रेरणा मिळाल्या. त्यातून विविध कार्यकर्ते घडले. ग्रंथालय चळवळ उभी राहिली. ग्रंथालयांबद्दल आत्मीयता आणि जिव्हाळा असलेल्या व्यक्ती एकत्र आल्या आणि भारतातली पहिली ग्रंथपालांची स्वतंत्र अशी संघटना उभी राहिली. ३० जानेवारी १९२८ रोजी श्री रंगनाथन यांनी मद्रास ग्रंथालय संघाची स्थापना केली . अल्पावधीतच या संघटनेचे ८०० सभासद झाले. श्री के.वी. कृष्णराव स्वामी आयर हे या संघाचे पहिले अध्यक्ष होते. या संघाकडून ग्रंथालय शास्त्राबद्दल जागृती करण्यासाठी परिसंवाद आयोजित केले गेले.या परिसंवादात अनेक मान्यवर व्यक्तींनी सहभाग घेतला. यात गुरुदेव श्री रवींद्रनाथ टागोर यांचाही समावेश होता. याच संघाने इसवी सन १९२९ मध्ये ग्रंथालय शास्त्र शिक्षणाचाप्राथमिक स्वरूपाचा वर्ग सुरू केला. हा अभ्यासक्रम तीन महिन्याचा होता. भारतातील अनेक ग्रंथालयांनी या अभ्यासक्रमाचा लाभ घेऊन आपले कर्मचारी प्रशिक्षित केले. श्री.रंगनाथन यांचे नाव जगात सर्वतोमुखी झाले त्याचे कारण त्यांचा फाईव लॉ ऑफ लायब्ररी सायन्स हा महत्त्वाचा ग्रंथ. मद्रास ग्रंथालय संघाने जून १९३१ मध्ये हा ग्रंथ पहिल्यांदा प्रकाशित केला. या ग्रंथात श्रीरंगनाथमन यांनी ग्रंथालयाच्या विकासाची पाच सूत्रे नमूद केली जी आजही जगात मार्गदर्शक आहेत. ग्रंथालय शास्त्रात ही पाच सूत्रे पुढीलप्रमाणे आहेत.

१- ग्रंथ हे उपयोगासाठी आहेत.
२- ग्रंथ सर्वांसाठी आहेत.
३- प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळाला पाहिजे.
४-प्रत्येक वाचकाला त्याच्या आवडीनुसार ग्रंथ मिळाला पाहिजे.
५- ग्रंथालय ही वर्धिष्णु संस्था आहे.

**(पान ४ वर)**

# 'तुकाराम' : व्यवस्था उद्ध्वस्त करणाऱ्या एका बाणेदार युगाची गाथा!



डॉ.लीना निकम
नागपूर

दोन दिवसांपूर्वीच 'इरा पब्लिकेशन'कडून हाती आलेलं हे पुस्तक! हातात पडलं आणि वाचायला घेतलं... मग काय, रात्रीचा दिवस कधी झाला अन् शेवटचं पान कधी उलटलं, हे माझं मलाच कळलं नाही. कारण पुस्तक हातातून सोडवतच नव्हतं! शफी पठाण या पत्रकाराने लिहिलेल्या या पुस्तकात मराठी भाषेचा जो गोडवा, नजाकत आणि प्रादेशिक मातीचा सजीव वास दरवळतो, तो थेट काळजाला भिडणारा आहे. ही कथा केवळ आय.ए.एस.अधिकाऱ्याची जीवनगाथा नाही तर एका वादळाची, एका जिवंत सत्याग्रहाची, त्यागाची आणि आदरणीय नात्यांच्या अथांग विश्वासाची कथा आहे!

पुस्तकाच्या सुरुवातीलाच लेखकाने रेखाटलेला तुकारामाच्या बालपणीचा तो प्रसंग अंगावर काटा आणणारा आहे! अवघ्या लहान वयात जुन्या वाड्याच्या माडीवरून तब्बल १२ फूट खाली दगडी चौकावर कोसळलेला तो चिमुकला जीव... रक्तबंबाळ आणि निष्प्राण झालेला देह पाहून अख्ख्या कुटुंबाचा टाहो फुटला होता. पण नियतीला काही वेगळंच घडवायचं होतं! त्या अपघातातून, अन् पुढे पोलिओसारख्या आजाराच्या विळख्यातूनही मृत्यूला हुलकावणी देऊन हा तुकाराम जिद्दीने पुन्हा पायावर उभा राहिला. लहानपणापासूनच ज्याने मृत्यूशी आणि प्रतिकूलतेशी दोन हात केले, त्याला पुढच्या आयुष्यात कसली भीती वाटणार?

पुस्तकाला लाभलेली अशोक मुंढे यांची प्रस्तावना वाचतानाच मन गलबलून येतं. गरीब आई-वडिलांच्या पोटी जन्मलेल्या या भावांनी गरिबीशी केलेला लढा थक्क करणारा आहे. तुकारामने शिकावं आणि गरिबीचे हे चक्रव्यूह तोडावं, म्हणून स्वतःच्या स्वप्नांची होळी करत शेतात नांगर धरणारे, लहान भावाला जिवापाड जपणारे मोठे भाऊ अशोक मुंढे म्हणजे त्यागाची मूर्तिमंत व्याख्याच! ते स्वतः आयएएस ऑफिसर होते आणि आपल्या लहान भावाचा आदर्श होते. त्यांच्या या संस्कारांचे मूळ होते त्यांच्या गरीब आई-वडिलांच्या मातीत. नुकतंच त्यांच्या आईचं निधन झालं; पण पारंपरिक कर्मकांडांचा अवडंबर न माजवता, जिथे आईला विसावा दिला तिथे झाडं लावून या कुटुंबाने पुन्हा एकदा आपला विवेकवादी विचार सिद्ध केला. आईच्या मायेला झाडांच्या रूपाने जिवंत ठेवणारं हे कुटुंब खरंच वेगळं आहे! या पुस्तकातून पुढे येणारा आणखी एक अत्यंत भावूक आणि माझ्या मनाला थेट स्पर्शून गेलेला भाग म्हणजे माझा भाऊ डॉ .मनीष गायकवाड आणि तुकाराम मुंढे यांच्यातील अतुट मैत्रीचा संदर्भ!

वाचताना जुन्या आठवणींचा पट डोळ्यांसमोर उभा राहतो... हे दोघेही मुंबईला एकाच होस्टेलवर एकत्र राहत होते. प्राध्यापक म्हणून इस्माईल युसुफ कॉलेजमध्ये तुकारामांची नेमणूक झाली होती आणि सिडनहॅम कॉलेजमध्ये मनीषची. ग्रामीण भागातून आलेल्या या दोघांच्या मनात पुढे जाण्याची प्रचंड जिद्द होती. आपली इंग्रजी भाषा सुधारावी म्हणून हे दोघे होस्टेलवर असताना परस्परांशी खास इंग्रजीतच संवाद साधायचे! आयएएस च्या प्रिपरेशनसाठी मॉक इंटरव्यू पण भावाने त्यांच्याकडून तयार करून घेतला होता. मुंढे ज्या टेबलवर बसून रात्रं-दिवस अभ्यास करत होते, स्वप्ने पाहत होते, तो अभ्यासाचा टेबल माझ्या भावाने आजही अगदी प्रेमाने अन् आदराने जपून ठेवला आहे! बघा ना, केवढी ही जिव्हाळ्याची निष्ठा! तो लाकडाचा टेबल दोघांच्या मैत्रीची, संघर्षाची आणि एका ध्येयवेड्या प्रवासाची जिवंत साक्ष आहे. गेल्या २५ वर्षांत ज्या माणसाच्या २५ ठिकाणी बदल्या झाल्या, ज्यांना राज्यकर्ते आणि प्रस्थापित व्यवस्था एका जागी टिकू देत नाही, तो माणूस म्हणजे तुकाराम मुंढे! सत्ताधीशांचा दबाव असो, भ्रष्टाचाराचा अजस्र राक्षस असो की कामचुकार नोकरशाही... या माणसाने प्रत्येक पावलावर अपमान, अवहेलना, उपेक्षा आणि बहिष्कार सहन केला; पण आपल्या नैतिक ध्येयापासून ते तसूभरही ढळले नाहीत. जसं संत तुकारामांनी अन्यायाविरुद्ध आणि दांभिकतेविरुद्ध सत्याची कास धरली, अगदी त्याच बाण्याने आज हे तुकाराम मुंढे प्रशासकीय सिस्टीम बदलवत आहेत. लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी एकापाठोपाठ एक अस्वच्छ हॉटेल्सवर धाडी टाकून ते प्रस्थापितांचे धाबे दणाणून सोडत आहेत. मुलांचे आरोग्य बिघडवणारे, पिझ्झा-बर्गर-चॉकलेटच्या मोहात लठ्ठपणा आणि आजारपण वाढवणारे रॅकेट्स त्यांनी वठणीवर आणले आहेत.

संत तुकारामांच्या शब्दांत सांगायचं तर,
भले तरी देऊ कासेची लंगोटी ।
नाठाळाचे माथा हाणू काठी ।।
या न्यायाने, राजकारण्यांचा दबाव झुगारून ते ताठ मानेने पुढे चालत आहेत. शफी पठाण यांनी पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेतच या कृतीचा गाभा स्पष्ट केला आहे. त्यांनी हे पुस्तक समर्पित केले आहे,

नैतिक मूल्यांच्या भक्कम पायावर स्वाभिमानी समाज घडवू पाहणाऱ्या विवेकवादी लोकांना आणि डोळ्यांत तरंगणाऱ्या भव्य स्वप्नांच्या पूर्ततेसाठी झपाटल्यागत दिवस-रात्र अपार कष्टांची पराकाष्ठा करणाऱ्या अदम्य जिद्दीच्या तरुणाईला!

आजच्या स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या आणि आयुष्यात काहीतरी करू पाहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी हे पुस्तक एक 'फ्रेंड, फिलॉसॉफर अँड गाईड' आहे! अभ्यासाचे प्रतिकूल वातावरण, साधनांची कमतरता किंवा गरिबी या गोष्टी यशाच्या मार्गात अडसर ठरू शकत नाहीत, हा आत्मविश्वास हे चरित्र विद्यार्थ्यांना देतं. घरच्या गरिबीचा बाऊ न करता, परिस्थितीची ढेकळं फोडत आभाळाला गवसणी घालण्याची जिद्द हे पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात पेरून जातं. हे पुस्तक वाचून एका जरी विद्यार्थ्याने या संघर्षातून प्रेरणा घेतली आणि स्वतःचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी कष्टाची पराकाष्ठा केली, तर शफी यांनी हे पुस्तक लिहिण्याचे आणि तुकाराम मुंढेंनी सोसलेल्या या संघर्षाचे खऱ्या अर्थाने सार्थक झाले, असे म्हणावे लागेल!

कुठलाही लेखक जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याला शब्दांच्या चौकटीत सामावून घेण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा ती केवळ एक साहित्यिक कृती राहत नाही; तर तो त्या व्यक्तीच्या संघर्षाचा, वेदनांचा आणि त्या वेदनांवर मात करून मिळवलेल्या विजयाचा परिश्रमपूर्वक घेतलेला शोध असतो. लेखक शफी हा शोध नेमकेपणाने घेण्यात पूर्णतः यशस्वी झाले आहेत. हे चरित्र केवल वाचनीय नव्हे, तर चिंतनीय आणि अनुकरणीय व्हावे, ही अपेक्षा शंभर टक्के खरी ठरते. सत्याग्रही, चिंतनशील वाचक आणि ध्येयवेड्या विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक एक अनमोल दीपस्तंभ आहे!

# स्मरणशक्तीचा पाया



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

आनंदी वाटचाल



मनुष्याच्या सभोवार अनंत घटना, प्रसंग घडत असतात .पण या सभोवार घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे पूर्ण लक्ष देऊन सर्व गोष्टींचे स्मरण ठेवण्याचा कोणी प्रयत्न करू लागले तर ते शक्य होत नाही .मनुष्याची स्मरणशक्ती मर्यादित असते आणि म्हणून प्रत्येकाने आपल्या स्मरणशक्तीची मर्यादा ओळखून स्वतःच्या कार्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या गोष्टींवरच आपले लक्ष केंद्रित करणे आवश्यक असते .आ-पले लक्ष इष्ट गोष्टींवर केंद्रित करणे याला बुद्धीची एकाग्रता असे म्हणतात. लक्ष, अवधान किंवा एकाग्रता हा स्मरणशक्तीचा पाया आहे .ज्यांची स्मरणशक्ती चांगली नसते त्यांचे आपल्या कामाकडे लक्ष नसते असे दिसून येते. ज्या गोष्टी स्मरणात ठेवायच्या असतील त्यांच्याकडे पूर्ण लक्ष देण्याची सवय केल्यास त्यांच्या प्रतिमांचे ठसे स्मृति पटनावर स्पष्ट उमटत जाऊन स्मरणशक्ती वाढल्याशिवाय राहत नाही, स्मृती पटलावर घडणाऱ्या सर्व प्रतिमा आपल्या ज्ञानेंद्रियांच्याद्वारे घडत असल्यामुळे सर्व ज्ञानेंद्रिय उत्तम प्रकारे कार्यक्षम नसले आणि त्यांचे कार्य चांगल्या रीतीने होत नसले तर त्यांच्याद्वारे पडणाऱ्या प्रतिमा अस्पष्ट असतात आणि म्हणून स्मरणशक्ती चांगली होण्याकरिता सर्व ज्ञानेन्द्रिय व विशेषता डोळे आणि कान यांची कार्यक्षमता वाढविणे जरूर असते.

२) ठसे कायम राहणे स्मरणशक्ती, स्मरणाकरिता आवश्यक असणारी दुसरी क्रिया म्हणजे स्मृती पटलावर उमटलेल्या प्रतिमांचे ठसे तेथे कायम राहणे ही होय. फोटोच्या काचेवर उमटलेल्या प्रतिमा कायम राहण्याकरता काच रासायनिक द्रव्यांनी धुवावी लागते. स्मृति पटलावरील प्रतिमा रासायनिक द्रव्यांच्या सहाय्याने कायम करता येत नाही. त्या निराळ्या रीतीने कायम होऊ शकतात. पण मूळची प्रतिमा स्पष्ट उमटलेली असेल तरच ती कायम टिकण्याचा संभव असत-ो ही गोष्ट लक्षात ठेवणे जरूर आहे. स्मृति पटलावरील ठसे पुढील प्रकारे टिकाऊ होतात.

एक) आपल्या आवडीच्या विषयांकडे आपले लक्ष चांगल्या प्रकारे वेधले जाते व त्यासंबंधी विचार आपल्या बुद्धीत नेहमी चालू असतात त्यामुळे त्या विषयासंबंधीच्या प्रतिमा जास्त टिकाऊ असतात आणि म्हणूनच आवडते विषय स्मरणात लवकर राहतात आणि त्यांचे स्मरण दीर्घकाळपर्यंत राहते. न आवडणाऱ्या विषयांचे विस्मरण लवकर होते.

दोन) ज्या गोष्टींमुळे मनात तीव्र भावना निर्माण होतात त्यांचे स्मरण दीर्घकाळपर्यंत राहते .तीव्र दुःख, असह्य अपमान, गर्भगळीत करून टाकणारी भीती किंवा मनाला आनंद देणारा अत्यंत सुखकारक प्रसंग यांचे स्मरण सहसा नाहीसे होत नाही असल्या प्रसंगांना अविस्मरणीय प्रसंग असे म्हणण्यात येते. प्रत्येक अविस्मरणीय प्रसंगी मनात कोणत्यातरी भावना उत्कटपणे निर्माण झालेल्या असतात.

भावना शून्य घटनांच्या प्रतिमांचे ठसे स्मृति पटलावर उमटत नाही किंवा फारच अस्पष्ट असतात व ते फार थोड्या थोड्या वेळ टिकतात. त्यांचे स्मरण फार दिवस राहू शकत नाही .

तीन) एखादी स्वतंत्र घटना किंवा अनुभव स्मरणात राहणे कठीण पडते पण निरनिराळ्या घटनांचा किंवा अनुभवांचा संबंध कोणत्यातरी विचारांच्या साख-ळीने एकमेकांशी जोडता आला तर एकाच्या स्मरणाने दुसऱ्याचे स्मरण होते आणि स्मरण ठेवणे सोपे जाते. निरनिराळ्या विषयासंबंधी ज्ञानाचे अनुभवाचे वर्गीकरण करून कोणत्यातरी तत्त्वानुसार त्यांचे पध्दतशीर गट पाडता आले तर त्यांचे स्मरण ठेवणे सोपे जाते .अशा प्रकारे ज्ञानाची पद्धतशीर मांडणी करणे याला शास्त्र असे म्हण-तात. निरनिराळ्या विषयानुसार आणि तत्वानुसार ज्ञानाचे वर्गीकरण करून भिन्न भिन्न शास्त्रे बनविली जातात. त्यामुळे त्या शास्त्रांचा अभ्यास करणे सुलभ जाते.ज्ञानाचे वर्गीकरण झाले नसते तर ते ज्ञान स्मरणात ठेवणे अत्यंत कठीण झाले असते व त्यांची वाढ होऊ शकली नसती .

चार )स्मृती पटलावर पडणाऱ्या प्रतिमा कायम ठेचण्याचा व्यवहारात उपयोगात आणला जाणारा नेहमीचा उपाय म्हणजे त्याच प्रतिमा स्मृती पटलावर पुन्हा पुन्हा उमटविणे याला अभ्यास किंवा घोकुन पाठ करणे असे आपण म्हण-तो. त्याच त्या प्रतिमा अनेक वेळा स्मृती पटलावर उमटवीत गेल्याने त्या साहजिकच कायम होतात त्याप्रमाणे प्रतिमा अनेक प्रकारे कायम आणि टिकाऊ होऊ शकतात एकच रीत सर्वांना सारखी लागू पडत ना-हीत.

स्मृति पटलावर पडणाऱ्या प्रतिमा टिकाऊ असतील तरच ज्यामानाने टिकाऊ असतील त्यामानानेच मनुष्याची स्मरणशक्ती चांगली असते व त्याच्या ज्ञानाचा साठा वाढतो मनुष्याने कितीही ज्ञान करून घेत-ले तरी त्यापैकी जे त्यांच्या स्मरणात रा-हते त्यांच्याच उपयोग त्याला होऊ शकतो म्हणून स्मरणाची उपासना करणे योग्य ,योग्य ज्ञानाची निवड करून ते आपल्या स्मृती पटलावर कायम ठेवण्याची कला ज्याला साधते तोच व्यवहारात यशस्वी होतो, आणि त्याची उन्नती होत जाते. स्मरणा करिता आवश्यक असलेली तिसरी क्रिया म्हणजे असलेल्या ज्ञानाची वेळेवर आठवण होणे ही होय. स्मृती पटलावर प्रतिमांचे ठसे प्रथम स्पष्ट उमटलेले असले व तेथे कायम राहिलेले असले म्हणजे जरुरीच्या वेळी आठवण होणे फारसे अवघड नसते मन स्थिर आणि अनिष्ट प्रकारच्या भावनांपासून मुक्त असले म्हणजे स्मरणाला अडचण होत नाही.

# सोबत



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

उमलत्या कळ्या

सूचना फलकावर पावसाळी क्रीडा स्पर्धेचे निवेदन लिहिले होते. दुपारच्या सुट्टीत विद्यार्थ्यांनी वाचल्यावर आश्रमशाळेतील मुला-मुलींमध्ये प्रचंड उत्साह संचारला होता. पावसाळी वातावरणात मैदानात खेळायची मजा वेगळीच असते. हवेत गारवा असल्यामुळे घाम लवकर येत नाही, त्यामुळे लवकर थकणे होत नाही. खेळ खेळताना पूर्ण क्षमतेने खेळता येते. जिंकण्यासाठी आटोकाट प्रयत्न करता येतात. या सगळ्याचा अनुभव घेतलेली कामिनी तर खूपच खूश झाली होती. गेल्यावर्षी तिच्या संघाने कबड्डी, खो-खो आणि व्हॉलीबॉल या तिन्ही खेळांच्या सामन्यात अंतिम फेरी गाठली होती. यंदा विजेते पद मिळवायचेच असा विचार करत कामिनीने स्पर्धेची तारीख लक्षात ठेवली. अजून किती दिवस बाकी आहेत हे ती बोटावर मोजू लागली. तशीच ती वर्गात आली आणि आपल्या संघात कोण-कोण असावे, याचा ती अंदाज बांधू लागली. तिला ठाऊक होते की दहावीतील प्रांजली यंदा शाळेत नाही, त्यामुळे संघाचे नेतृत्व तिच्याकडेच येणार आहे. क्रीडाशिक्षक वैद्यसरांचा तिच्या खेळावर विश्वास होता. कामिनीने आठवी, नववीच्या वर्गात जाऊन खेळाडू शोधण्याचा वरवरचा प्रयत्न केला. कबड्डीच्या संघात ताकदवान आणि चपळ मुली खेळाडू म्हणून आपल्या संघात असाव्यात, असा कामिनीचा आग्रह होता. ती मनातल्या मनात खेळाडूंची जमवाजमव करत होती. संध्याकाळी वसतिगृहावर परतल्यावर तिने आपल्या मैत्रिणींशी स्पर्धेविषयी चर्चा केली. तेवढ्यात तिला यंदाच वसतिगृहात आठवीच्या वर्गात नव्याने प्रवेश घेतलेली अस्मिता दिसली. ती आपल्या कॉटवर पसरलेल्या कपड्यांच्या घड्या घालत होती.

काय गं, खेळशील का आमच्या टीममध्ये? कामिनीने थेट विचारले.

हं.. नको अस्मिता मान खाली घालून बोलली.

अगं खेळ.उद्या प्रॅक्टिसला थांब ग्राऊंडवर. तूखेळलीस तर एकदम भारी होईल.

अगं खेळ गं अस्मिता, तुलाही मजा येईल. नेहाने आग्रह केला.

मात्र अस्मिताने प्रतिसाद दिला नाही. मग इतर मुलींनीही तिला फार आग्रह केला नाही. कामिनीला मात्र वाटत होते की अस्मितामुळे आपला संघ तगडा होऊ शकतो.

मग रात्रीचे जेवण उरकल्यावर मुली समोरच्या मैदानात गप्पा मारत होत्या. हीच योग्य वेळ आहे असे समजून कामिनीने अस्मिताला गाठलं. दोघी मैदानाच्या कोपऱ्यात विजेच्या खांबाजवळ उभ्या राहून गप्पा मारू लागल्या.

काय गं! करमत नाही का तुला हॉस्टेलमध्ये? घरची आठवण येते का? कामिनीने विचारले.

नाही. अस्मिता

अगं बोलायला शिक. इथं आपण सगळ्याजणी घरापासून दूर आहोत, काही दुखलं खुपलं तर आपणच

आहोत एकमेकींना. कामिनी बोलली.

बरोबर आहे तुझं. मी येईन उद्या ग्राऊंडवर प्रॅक्टिसला. अस्मिता म्हणाली.

अगं, नुसतं खेळायला नाही. आपल्याला या वर्षी जिंकायचंय. तू चांगली खेळू शकतेस.

मी खेळायचे आधी! शाळेतल्या प्रत्येक खेळात सहभागी व्हायचे.

तुला पाहिल्याक्षणी मला जाणवत होतं की तू चांगली खेळत असावीस. बरं झालं तुझ्यामुळे संघाची ताकद वाढेल.

हल्ली खेळावसं नाही वाटत. सगळं नकोसं वाटतं.

का गं? काही प्रॉब्लेम आहे का? कामिनीने विचारले.

काही नाही, असंच.

काही नाही म्हणजे? काहीतरी कारण असेल ना!

मला एकटं एकटं राहावसं वाटतं.




कोणाशी बोलावं, कोणात मिसळावं असं वाटत नाही.

अगं वेडे! तुझा काय प्रेमभंग झालाय की काय?

छे! तसलं काही नाही. जाऊ दे! उद्यापासून आपण प्रॅक्टिस सुरू करू.

मग पुढच्या दिवशी शाळेच्या मैदानावर क्रीडास्पर्धेची प्रॅक्टिस सुरू झाली. शाळेचे मैदान मोठे होते. कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल या खेळासाठी स्वतंत्र मैदाने होती. मुला-मुलींचे संघ जवळपास निश्चित झाले होते. क्रीडाशिक्षक स्वतः मैदानात उभे राहून मुला-मुलींकडून सराव करून घेत होते. शाळा सुटल्यावर दोन- अडीच तास कसून सराव झाला की मुला-मुलींना कडकडून भूक लागायची. सगळ्यांची पावले वसतिगृहाकडे वळायची. कामिनी मात्र अस्मिताच्या सोबत रहायची. दोघी सोबतच हॉस्टेलवर यायच्या. कामिनीच्या सोबतीमुळे अस्मिताला थोडे बरे वाटत होते.

काय गं, तुझी पकड तर एकदम भारी आहे. तुमचा संघ कधी राज्यस्तरापर्यंत गेला होता की नाही?

कामिनीने विचारले.

अंगं मी जिल्हा परिषदेच्या शाळेत होते. तिथे क्रीडास्पर्धा जिल्हास्तरापर्यंतच होतात. मला पाच सहा बक्षीसेही मिळाली आहेत.

अस्मिता. तुझ्या अंगात खेळ आहे. तू खेळायला हवं.

अंगं मनातून तसं वाटतंय मला...पण... अस्मिताने वाक्य अर्धवट सोडलं.

मग कामिनीने तिला फार छेडलं नाही. अस्मिताला आपल्या सोबतीची गरज आहे एवढं त्याने जाणलं नि दोघी हॉस्टेलकडे परतल्या. त्या दिवसापासून दोघी जिवाभावाच्या मैत्रिणी झाल्या. शाळेत गेल्यावर वेगवेगळ्या वर्गात बसायच्या. मात्र हॉस्टेलवर, मैदानावर त्या कायम सोबत असायच्या. त्यामुळे काही मुली दोघींची चेष्टाही करू लागल्या.

अंगं, मी आमच्या गावातल्या हायस्कूलमध्येच डमिशन घेणार होते. पण फक्त तुला म्हणून सांगते... असं म्हणत अस्मिता आजूबाजूला पाहू लागली. कामिनीने मात्र तिच्या चेहऱ्यावर अजिबात कुतूहल दाखवले नाही.

माझी सावत्र आई आहे घरी. मला मासिक पाळी येत नाही, हे मी तिला सांगितले तर तिने ज्याला-त्याला सांगायला सुरुवात केली. माझ्या वडिलांना भीती वाटू लागली की माझे लग्न होणार नाही. तेव्हापासून माझ्या घरातील सगळं वातावरणच बिघडून गेलं. मला कशातच रस वाटेनासा झाला,ïïï; अस्मिताने एका दमात सांगून टाकलं.

तू खेळायचं अस्मिता! तुझ्या मनाची अवस्था मी जाणू शकते. कारण मलाही अगदी गेल्या वर्षापर्यंत पाळी येत नव्हती. इतर सगळ्याजणी त्यांच्या नियमित येणाऱ्या पाळीविषयी मला सांगायच्या. त्या तीन-चार दिवसातील त्यांचा बदलणारा मूड, त्यांचे पोटात दुखणे, हातपाय दुखणे हे बघायचे. मला वाटायचे की मला एखादा मोठा आजार आला असावा, म्हणून मला पाळी येत नाही. मनात सारखे तेच-तेच विचार यायचे. माझी आई काळजी करायची. पण एके दिवशी इथे एक डॉक्टर आल्या होत्या. सगळ्या मुलींची तपासणी संपल्यावर मी पुन्हा त्यांच्याजवळ गेले नि माझा प्रॉब्लेम मी त्यांना सांगितला. तर त्या हसत म्हणाल्या, जंगलातील सगळी झाडं सारखीच आहेत का? सर्व आंब्यांच्या झाडांना एकसारखे आंबे येतात का? तसं प्रत्येक व्यक्ती वेगळी आहे. काहींना लवकर पाळी येते, कुणाला तेराव्या-चौदाव्या वर्षी येते. काहींना ती सोळाव्या-सतराव्या वर्षी येते. काहींना तर अनियमितपणे पाळी येते. यात अजिबात घाबरायचं नाही. त्यापेक्षा भरपूर जेवायचं, भरपूर पाणी प्यायचं नि व्यायाम होईल असं भरपूर खेळायचं. महत्वाचं म्हणजे डॉक्टरांचा सल्ला अवश्य घ्यायचा. डॉक्टरांच्या अशा बोलण्यामुळे मला खूप धीर आला. तेव्हापासून मी मैदानावर भरपूर खेळते. खाऊ खायचा म्हटला तर खजूर, फुटाणे, बीट, गाजर, शेंगदाणे खाते. तू ही तसंच कर. होईल सगळं व्यवस्थित.

मला हे थोडसं माहित होतं, पण सावत्र आईने गावभर पसरवलं. त्याचं मला फार टेन्शन आलं होतं. आता इथेही आल्यावर तो विषय नको, म्हणून मी कोणात मिसळायचं नाही असं ठरवलंय.

वेडी आहेस तू! न बोलल्याने प्रश्न सुटणार नाहीत. त्यापेक्षा दोस्ती कर. सोबतीला रहा, सगळं नीट होईल.

तू म्हणतेस ते पटतंय मला.

त्या दिवसापासून अस्मिताची मैदानावरील खेळाची प्रॅक्टिस सर्वांच्याच नजरेत भरू लागली.

# भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ.एस.आर.रंगनाथन...

(पान १ वरुन)

याचप्रमाणे श्री रंगनाथन यांनी सन १९२५ ते १९३३ या काळात सखोल चिंतन करून द्वि-बिंदू वर्गीकरण पद्धती हा महान ग्रंथ लिहिला.या ग्रंथाची पहिली आवृत्ती मद्रास ग्रंथालय संघाच्या वतीने १९३३ मध्ये प्रकाशित करण्यात आली. आजवर या ग्रंथाच्या अनेक आवृत्ती झालेल्या आहेत.या पद्धतीमुळे आणि पाच मौलिक सिद्धांतामुळे जगातील ग्रंथालयातील ग वर्गीकरण पद्धतीला एक वेगळे वळण लागले. या पद्धतीची उपयोगिता पाहून.

श्री.रंगनाथन यांचे नाव भारतात आणि भारताबाहेर देखील प्रसिद्ध झाले. द्वि बिंदू वर्गीकरण पद्धतीचे प्रात्यक्षिक पहिल्यांदा मद्रास विद्यापीठाचे ग्रंथालयात करण्यात आले. भारतीय भाषा, भारतीय ज्ञान यातील सुक्ष्मातील सूक्ष्म अशा ज्ञानाच्या वर्गीकरणाची शक्ती या पद्धतीत आहे हे सर्व मान्य झाले. पुढे श्री रंगनाथन यांच्या प्रयत्नाने भारतीय ग्रंथालय संघ यांची स्थापना कलकत्ता येथे भरलेल्या ग्रंथालयांच्या मेळाव्यात करण्यात आली. पुढे सन १९४२ च्या सुमारास भारतीय ग्रंथालय संघाच्या वतीने ग्रंथालीन कायद्याचा मसुदा त्यांनी तयार केला. सन १९४२ च्या सुमारास श्री रंगनाथन यांनी शालेय आणि महाविद्यालयीन ग्रंथालय हा ग्रंथ लिहिला. त्यामुळे शाळेतील ग्रंथालय उत्तम पद्धतीने चालवायला मार्गदर्शन करणे शक्य झाले. पुढे शालेय दृष्ट्या विविध ग्रंथांचे वर्गीकरण कसे करता येईल यासाठी श्री रंगनाथन यांनी ग्रंथालय वर्गीकरणाची मूलतत्त्वे आणि पद्धती हा ग्रंथ लिहिला. सन १९४४ च्या सुमारास भारतीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी कार्य केले. सन १९४५ मध्ये डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन हे बनारस विश्व हिंदू बनारस हिंदू विद्यापीठाचे कुलगुरू असतांना त्यांनी विद्यापीठाच्या ग्रंथालयाची जबाबदारी श्री रंगनाथन यांच्यावर सोपवली. तेव्हा ते २१ वर्षाच्या सेवेनंतर मद्रास विद्यापीठाच्या ग्रंथालय पदावरून सेवानिवृत्त झाले होते . पुढे इसवी सन १९४५४६ या दोन वर्षात त्यांनी बनारस हिंदू विद्यापीठाच्या ग्रंथालयात अमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. या विद्यापीठात ग्रंथालय शास्त्राचा प्रमाणपत्राचा वर्ग त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमच सुरू करण्यात आला. सन १९४६ च्या सुमारास अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेचे सातवे अधिवेशन बडोदा येथे घेण्यात आले. या अधिवेशनात त्यांनी ग्रंथालय चळवळीच्या कार्यकर्त्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. त्यांच्या ग्रंथालय चळवळीतील उत्कृष्ट कार्याकरिता त्यांना अनेक प्रतिष्ठेचे सन्मान मिळाले. श्री.रंगनाथन यांना त्यांच्या ग्रंथालय शास्त्रातील आणि चळवळीतील मौलिक कामगिरीबद्दल सन १९४८ मध्ये डि.लीट. ही बहुमानाची पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. या पदवीदान समारंभाला तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि शिक्षण मंत्री माननीय मौलाना अब्दुल कलाम आझाद उपस्थित होते. या पुरस्काराने भारतातील ग्रंथालय चळवळीतील योग्य कार्यकर्त्याचा सन्मान करण्यात आला. २६ जानेवारी १९५७ च्या प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर तत्कालीन राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांनी श्री रंगनाथन यांना पद्मश्री ही बहुमानाची पदवी बहाल केली. त्यांच्या असामान्य कर्तुत्वाचे योग्य मूल्यमापन झाले त्याचा आनंद सर्व ग्रंथ प्रेमी आणि ग्रंथालयातील चळवळीतील कार्यकर्त्यांना झाला पुढे १९९२ ला रंग डॉक्टर रंगनाथन यांच्या जन्मशताब्दी वर्षात भारत सरकारने एक डाग तिकीट देखील प्रसारित केले आहे भारतासारख्या देशात खेडोपाडी ग्रंथालय चळवळ पोहोचावी समृद्ध व्हावी यासाठी अहोरात्र झटणाऱ्या आणि भारतीय ग्रंथ शास्त्राला ग्रंथालय शास्त्राची पताका जगभर फडकविणाऱ्या श्री रंगनाथन यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे पुढे त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ग्रंथालय समितीचे अध्यक्ष म्हणून काम करायचा मान मिळाला त्यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या ग्रंथालयांच्या विकासासाठी काही योजना आखले आणि त्या पूर्णत्वासनेल्या भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक डॉक्टर रंगनाथन यांची जन्मशताब्दी सन १९९१ -९२ या वर्षी साजरी करण्यात आली या निमित्ताने भारत सरकारने त्यांच्या सन्मानार्थ विशेष टपाल तिकीट प्रसारित केले असा हा थोर कार्यकर्ता वयाच्या ८०व्या वर्षी २७ सप्टेंबर १९७२ रोजी आपल्यातून निघून गेला.

गणिताचे प्राध्यापक म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. अध्यापनात त्यांना मनापासून आनंद मिळत होता. अशा वेळी १९२४ मध्ये त्यांची मद्रास विद्यापीठाच्या ग्रंथपालपदी नियुक्ती झाली. सुरुवातीला ही जबाबदारी त्यांनी अनिच्छेने स्वीकारली. मात्र इंग्लंडमधील ग्रंथालयांचा अभ्यास करताना त्यांच्या विचारविश्वात आमूलाग्र परिवर्तन झाले. ग्रंथालय ही समाजाला घडविणारी संस्था आहे, हा साक्षात्कार त्यांना झाला आणि त्यानंतर त्यांनी संपूर्ण आयुष्य ग्रंथालय चळवळीसाठी अर्पण केले. रंगनाथन यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे त्यांनी ग्रंथालयशास्त्राला शास्त्रीय पाया दिला. त्यांच्यापूर्वी ग्रंथालय म्हणजे पुस्तके ठेवण्याची जागा, एवढीच सर्वसामान्यांची समजूत होती. त्यांनी या संकल्पनेला बदलून ग्रंथालयाला वाचककेंद्रित बनवले. त्यांनी मांडलेले ग्रंथालयशास्त्राचे पंचसूत्र आजही जगभरातील ग्रंथालयांचे मार्गदर्शक तत्त्वज्ञान मानले जाते. आजच्या डिजिटल युगातही त्यांची पंचसूत्रे तितकीच समर्पक वाटतात. माध्यमे बदलली, पुस्तके मुद्रित स्वरूपातून ई-पुस्तकांमध्ये आली; परंतु वाचक आणि ज्ञान यांच्यातील दुवा म्हणून ग्रंथालयाचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. डॉ. रंगनाथन यांनी कोलन वर्गीकरण पद्धती विकसित करून जगाला एक अभिनव वर्गीकरण प्रणाली दिली. माहितीचे वैज्ञानिक पद्धतीने वर्गीकरण कसे करावे, याची दिशा त्यांनी दाखवली. आजच्या माहितीशास्त्र आणि डिजिटल डेटाबेस व्यवस्थापनातही त्यांच्या विचारांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. मद्रास, बनारस, दिल्ली आणि बेंगळुरू येथे कार्य करताना त्यांनी केवळ ग्रंथालयांची पुनर्रचना केली नाही, तर ग्रंथपालांची एक नवी पिढी घडवली. संशोधन, प्रशिक्षण, ग्रंथालय शिक्षण आणि सार्वजनिक ग्रंथालय चळवळ या सर्व क्षेत्रांत त्यांनी अविस्मरणीय योगदान दिले. भारतात सार्वजनिक ग्रंथालयांची संकल्पना रुजविण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. मद्रास लायब्ररी असोसिएशनची स्थापना, ग्रंथालयशास्त्राचे अभ्यासक्रम, संशोधन केंद्रे आणि राष्ट्रीय पातळीवरील ग्रंथालय विकासाची योजना ही त्यांच्या दूरदृष्टीची उदाहरणे आहेत. डॉ. रंगनाथन यांचे व्यक्तिमत्त्व जितके विद्वत्तेने समृद्ध होते तितकेच ते साधेपणाने उजळलेले होते. विद्यार्थ्यांवर त्यांचे अपार प्रेम होते. स्वतःच्या उत्पन्नाचा मोठा भाग त्यांनी ग्रंथालयशास्त्राच्या विकासासाठी दान केला. पुरस्कार आणि सन्मान मिळूनही त्यांच्यात अहंकाराचा लवलेश नव्हता. त्यांचा विश्वास होता की, ज्ञानाचा खरा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी झाला पाहिजे. आज माहितीचा विस्फोट झालेला आहे. इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल ग्रंथालये आणि ई-संसाधने यांचा काळ आहे. अशा वेळी रंगनाथन यांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. कारण त्यांनी दिलेला संदेश तंत्रज्ञानापेक्षा मोठा आहे-ग्रंथालयाचा केंद्रबिंदू पुस्तक नसून वाचक आहे. आपल्या देशातील प्रत्येक सार्वजनिक, शालेय, महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय ग्रंथालयाने त्यांच्या पंचसूत्रांचा आत्मा जपला, तर ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचेल. वाचनसंस्कृती बळकट होईल आणि समाज अधिक विवेकी बनेल. ९ ऑगस्ट हा केवळ एका महान ग्रंथालयतज्ज्ञाचा जन्मदिन नाही; तो ज्ञान, वाचन आणि समाजप्रबोधनाचा संकल्पदिन आहे. या निमित्ताने आज डॉ. एस. आर. रंगनाथन यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन ज्ञानसेवेचा हा अखंड दीप पुढे नेणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

(लेखक पूज्य साने गुरुजी ग्रंथालय,अंमळनेर चे माजी कार्यवाह आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे गड-किल्ले वैश्विक समृध्दीचे प्रतिक

(पान १ वरुन) काटेकोरपणे लक्ष दिले. महाराजांनी दुर्गबांधणी व त्याची निगा राखण्यासाठी अठरा हजार लोक नियुक्त केले होते.यामध्ये स्वराज्यातील मावळयांबरोबरच परकीय लोक ही वेगवेगळ्या किल्ल्याच्या कामावर नियुक्त केले होते. किल्ल्यावरील शासन व्यवस्थेतील अधिका-यांबरोबरच बांधकामासाठी लागणारे अधिकारी, तंत्रज्ञ, बेलदार आदि. लोकांची कायमस्वरूपी नेमणूक केली होती.

स्वराज्यामध्ये घाटमाथ्यावरील किल्ल्यांना विशेष महत्व पाप्त झाले होते. स्वराज्याच्या राजकीय घटना व घडामोडीचे केंद्रच हे किल्ले होते. घाटमाथ्यावरील प्रत्येक गड महत्वाचा होता.स्वराज्यातील देशावरील किल्ले लप्करीदृष्ट्या मजबूत आहेत. कोकणात घाटाखाली मोठ्या प्रमाणात किल्ले उभा करून स्वराज्याचे संरक्षण केले. घाटावरील हे गिरीदुर्ग स्वराज्याचे वैभव होते. स्वराज्यामध्ये सागरी किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्व होते.कोकणातील प्रत्येक जिल्हयामध्ये महत्वाचे जलदुर्ग आहेत. दक्षिण भारतातही पसरलेल्या मराठा स्वराज्यामध्ये देखने असे दुर्गवैभव अफाट आहे. छत्रपतींच्या स्वराज्यातील दक्षिणेतील शिरपेच म्हणावा लागेल असा किल्ला म्हणजे जिंजीचा किल्ला होय. मराठयांची राजधानी राहिलेल्या या दक्षिण किल्ल्याला विशेष स्थान आहे. छत्रपतींनी हा किल्ला अत्यंत भक्कम करून बलाढ्य बनविला राजगिरी, कृष्णगिरी व चंदगिरी असे स्वतंत्र गडांच्या आकाराचे खंदक आणि तंटबंदी वेढलेले या किल्ल्यात तीन बाल्लेकिल्ले आहेत.जिंजी किल्ल्याच्या सामर्थ्याचा विचार करता हा किल्ला म्हणजे भव्यतेचे मुर्तीमंत उदाहरण होय. छत्रपतींनी गोवा, कर्नाटक, तामिळनाडु, गुजरात या भागात ही महत्वपूर्ण किल्ले उभा केले. ॲबे करे या फ्रेंच प्रवाशाने छत्रपतींच्या गड-किल्ल्यांची स्तुती केली आहे. छत्रपतींची दुर्ग बांधणीची कला सर्वश्रेष्ठ आहे असे म्हटले आहे. सहयाद्रीच्या मदतीने उभा केलेल्या गड-किल्ल्याच्या माध्यमातून छत्रपतींची दुर्गदृष्टी किती व्यापक होती हे दिसुन येते. या गड-किल्ल्यांच्या देशात किल्ल्यांचा अचुक व योग्य उपयोग करणारे एकमेव राजे म्हणून छत्रपतींचे नाव जगामध्ये आदराने घेतले जाते. संपूर्ण जगाने अनुकरण करावी अशी शासनव्यवस्थेतील आदर्श तत्वे छत्रपतींच्या दुर्ग व्यवस्थापनात आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज शूर-वीर लढवय्ये तर होतेच,त्याचबरोबर त्यांच्याकडे विलक्षण ज्ञान होते.त्यांच्या थोर अशा विचारांचा जागर विश्वाच्या कल्याणासाठी झाला पाहिजे.जनहित व रयतेचे कल्याण हे छत्रपतींच्या शासन व्यवस्थेचे मुळ तत्व होते. जागतिक वारसा यादीत स्थान मिळालेल्या किल्ल्यांना जागतिक ओळख प्राप्त झाली आहे. जागतिक वारसा निधीच्या माद्यमातुन त्यांच्या जतनासाठी आर्थिक मदत मिळणार आहे. हे पर्यटन, स्थानिक रोजगार, संशोधन व तरूण पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. शौर्याचा इतिहास, भूगोल, मानवी जीवनमान व परंपरा, दुर्गाची भौगोलिकता याकडे जग आकर्षित होईल. यातुन दुर्ग जपणूकीला चालना मिळून वारसा स्थळांना जागतिक महत्व प्राप्त होईल. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभी केलेली दुर्गसंपदा म्हणजे अखंड हिंदूस्थानच्या शौर्याचा वारसा आहे. त्याला मिळालेला युनेस्कोचा जागतिक दर्जा हा त्या ऐतिहासिक समृध्दतेला आंतरराष्ट्रीय मान्यता देणारा आहे.



प्रा.डॉ.संजय ढोडरे
मो.९८२२५३३६४२

माझा खानदेश

# राष्ट्रीय आंदोलनात खानदेशातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान

भारत मातेला ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात सुवर्ण अक्षरात लिहिले गेले आहे. भारत मातेला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या या थोर स्वातंत्र्य सेनानी व त्यांचे धाडसी क्रांतिकारी कार्य नव्या पिढ्यांसाठी सदैव स्मरणीय व प्रेरणादायी राहिल असे आहे.

**स्वातंत्र्य सैनिक व्यंकटराव रणधीर**

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात गांधी विचारांनी प्रेरित झालेल्या व्यक्तिमत्त्वांचा विचार केला असता पश्चिम खानदेशातील व्यंकटराव रणधीर यांचे नाव अग्रणी आहे. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी दिलेले योगदान अतुलनीय असे आहे.

५ मे १९२३ या दिवशी धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील शिंगावे या गावात एका गरीब कुटुंबात जन्मलेले व्यंकटराव रणधीर यांनी प्राथमिक शिक्षण शिरपूर तालुक्यातील बोराडी व शालेय शिक्षण धुळ्यात केले. त्याकाळी धुळे स्वातंत्र्य चळवळीचे मुख्य केंद्र होते. धुळ्यातील स्वातंत्र्य सैनिकांशी त्यांचा संपर्क आला. वर्तमानपत्रांमध्ये स्वातंत्र्याविषयीच्या वार्ता वाचून त्यांच्या मनात राष्ट्र प्रेमाची भावना निर्माण झाली. धुळे शहर व परिसरातील फकीराआप्पा देवरे, विष्णूभाऊ पाटील, देवराम दादा पाटील या राष्ट्र प्रेमी स्वातंत्र्य सेनानींशी त्यांची ओळख झाली. राष्ट्रीय भावनेने प्रेरित असलेल्या व्यक्तिमत्त्वांच्या विचारातून प्रेरणा घेऊन ते स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाले.

मुंबईच्या सभेत महात्मा गांधींनी ब्रिटिश शासनाच्या निषेधाच्या घोषणा देत 'भारत छोडो' चा नारा देऊन क्रांतीचे रणशिंग फुंकले.

याच काळात व्यंकटराव रणधीर यांनी महात्मा गांधींची भेट घेतली व काँग्रेसमध्ये सभासद करून घेण्याचा आग्रह धरला. परंतु २१ वर्ष वय पूर्ण नसल्यामुळे, वयाची अट आडवी आल्याने त्यांना काँग्रेसमध्ये सभासद होता आले नाही.परंतु मनात मातृभूमी विषयीचे प्रेम व ब्रिटिशांबद्दलचा द्वेष स्वस्थ बसू देत नव्हता.त्याकाळी खानदेशात भूमिगत राहून अनेक छोट्या-मोठ्या कारवाया त्यांनी केल्या .शिरपूर ट्रेझरी तसेच बोराडी डाक बंगला जाळण्याची योजना हे सर्व करीत असताना ब्रिटिशांच्या दमनकारी कृत्याचाही सामना त्यांना करावा लागला .

खानदेशातील एक अत्यंत निष्ठावंत, संयमी आणि समाजाभिमुख नेतृत्व व महात्मा गांधीजींच्या अहिंसात्मक आणि रचनात्मक कार्यावर प्रचंड श्रद्धा असलेले खानदेशातील निष्ठावंत स्वातंत्र्य सैनिक म्हणून परिचित असलेले व्यंकटराव रणधीर यांनी संपूर्ण आयुष्य अत्यंत साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचे जगले. आपल्या संपूर्ण आयुष्यात त्यांनी खानदेशातील शेतकरी कामगार, आदिवासी आणि शोषितांच्या मुक्तीसाठी कार्य केले .

महात्मा गांधींचे नेतृत्वाखाली झालेल्या सविनय कायदेभंग, जंगल सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रहात सक्रिय सहभाग घेऊन धुळे जिल्ह्यात जंगल सत्याग्रह घडून आणण्यात त्यांनी मोठी भूमिका बजावली होती .ब्रिटिश सरकारने लादलेल्या जुलमी जंगल कायद्यांना न जुमानता हजारो शेतकऱ्यांना व आदिवासींना एकत्र करून जंगल सत्याग्रहाचे यशस्वी नेतृत्व करत सुत कताई, खादीचा वापर, दारूबंदी, अस्पृश्यता निवारणाचे काम त्यांनी त्या काळात केले. सरकार विरोधी घोषणा व कृती केल्याचा ठपका ठेवत तसेच १९४२ च्या आंदोलनात निदर्शने, मोर्चाचे आयोजन केल्याबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांना दीर्घकाळ कारावासात ठेवले. तुरुंगात असताना वतुरुंगातून बाहेर आल्यावरही त्यांनी आपले कार्य सुरूच ठेवले होते.


'भारत छोडो' आंदोलन काळात सर्व प्रमुख नेत्यांना अटक होत असताना सातपुड्यातील जंगल आणि तापी नदीचे खोरे या ठिकाणी गुप्तपणे राहून तरुणांची सेना तयार करून ब्रिटिश सरकारची दळणवळण यंत्रणा खराब करणे , रेल्वे रूळ उखळणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, सरकारी टपाल जाळणे, सरकारी खजाना नेणाऱ्या गाड्यांची लूट करण्याचे नियोजन करणे हे काम अतिशय धाडसाने केले.

खानदेशात स्वातंत्र्य चळवळीच्या पाया मजबूत करण्यात व्यंकटराव रणधीर यांचे मोलाचे योगदान आहे. महात्मा गांधींचे निष्ठावंत अनुयायी म्हणून त्यांची ओळख शेवटपर्यंत राहिलेली आहे.

'भारत छोडो' आंदोलन दरम्यान त्यांनी धुळ्यात आंदोलने केली. खानदेशातील कापड गिरणी कामगार व शेतमजुरांना संघटित करून ब्रिटिश सरकारने त्यांचे सोबती असलेले स्थानिक शासक, जमीनदार, सावकार यांच्या विरोधात त्यांनी कामगारांमध्ये राजकीय जागृती निर्माण केली.

**चित्त थरारक चिमठाणा सरकारी खजिना लूट**

१४ एप्रिल १९४४ रोजी धुळ्याहून नंदुरबार तालुका ट्रेझरीकडे सरकारी खजिन्याची मोठी रक्कम पाठविली जाणार असे व्यंकटराव रणधीर व साथीदारांना कळले. खजिन्याची रक्कम फार मोठी असल्याचे क्रांतीकारकांच्या लक्षात आले. म्हणून तो खजिना लुटायचा



मोटार अडवून खजिना लुटण्याची योजना आखण्यात आली. धुळयातून खजिना नंदुरबारला जाणार होता. धुळ्यापासून काही मैलांवर असलेल्या चिमठाणे गावाच्या जंगलात खजिना लुटण्यासाठी १५ क्रांतीकारक टांगे व बैलगाड्यातून लुट करण्यासाठी रात्रीच्या वेळी चिमठाण्याकडे निघाले, तेव्हा धुळे येथे पांझरा नदी ओलांडतांना व्हिक्टोरीया पुलावर (आताचा मोठा पूल)पोलिसांनी क्रांतीकारकांच्या गाड्या अडविल्या.पोलिस व क्रांतीकारक यांच्यात थोडा वेळ संघर्ष झाला. यावेळी व्यंकटराव रणधीर आणि त्यांचे सहा साथीदार हे पायी पळत डांगुर्णे या गावी येवून पोहोचत त्यांनी एका शेतात रात्री मुक्काम केला. सकाळी अकराच्या सुमारास खजिन्याची गाडी (गाडी नं. -बी.वाय.पी. ४२२ ) अडविण्याचा प्रयत्न चालकाच्या सतर्कतेमुळे अयशस्वी झाला. ११.३० वाजता चिमठाणे येथे पोहाचली. चिमठाणे येथे चहापानासाठी काही मंडळी खाली उतरली तेव्हा तेथे हजर असलेले पाचही क्रांतीकारक मोटारीत जावून बसले. तेव्हा पुर्वीचे पॅसेंजर आणि क्रांतीकारक यांच्यात गाडीत बसण्यावरुन भांडण झाले. शेवटी समझोता होऊन क्रांतीकारकांना गाडीत बसु दिले. चिमठाणे गावापासुन १ किलोमीटर अंतरावर गाडी आल्याबरोबर क्रांतीकारकांनी ड्रायव्हरला गाडी थांबवायला लावली. ड्रायव्हर गाडी थांबवेना म्हणुन क्रांतीकारकांनी ड्रायव्हरवर गोळ्या झाडल्या. इतर पॅसेंजर्सनी मोटारीतून भराभर उड्या मारल्या. पण क्रांतीकारकांनी 'महात्मा गांधीजी की जय', 'वंदे मातरम' अशा घोषणा दिल्या आणि नंतर क्रांतीकारकांनी खजिना घेऊन जाणाऱ्या ब्रिटिशांचा कारकूनकडून खजिन्याच्या पेट्या उघडून घेतल्या. तो खजिना चार गठ्ठयात बांधला होता.

खजिना लुटीची माहिती कळताच पोलिस खाते खडबडून जागे झाले. ह्या साडेपाच लाख रुपयांचा खजिना लुटीचा व्यंकटराव रणधीर आणि त्यांच्या साथीदार क्रांतीकारकांवर खटले भरून व्यंकटराव रणधीर, शंकरराव पांडु माळी आणि धोंडीराम तुकाराम माळी यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली.

क्रांतिकारकांना तुरुंगावास भोगावा लागला.नंतर देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर राजकीय कैद्यांची मुक्तता करण्यात आली.

**समाज, शिक्षण व राजकीय क्षेत्रात योगदान-**

स्वातंत्र्य आंदोलनाच्या दरम्यान व्यंकटराव रणधीर यांचा कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याशी संपर्क झाला. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याची प्रेरणा घेऊन १९४३ छात्रालय सुरू केले. पुढे किसान विद्या प्रसारक संस्था स्थापन करून ग्रामीण भागापर्यंत शिक्षणाची गंगा नेली. अनेक विद्याशाखांमधून शिक्षण घेण्याची संधी ग्रामीण भागातील दीन- दलित, आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना यातून मिळाली. आजही या संस्थेत हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शैक्षणिक कार्याबरोबर सामाजिक क्षेत्रातही व्यंकटराव रणधीर यांनी महत्त्वाचे कार्य केलेले आहे.सामुदायिक शेती सोसायटी, एक गाव एक पाणवठा मोहीम, ग्राम स्वच्छता अभियान, आदिवासी समाज जागृती , अंधश्रद्धा निर्मूलन, सामुदायिक गाव जेवणाचा कार्यक्रम, सत्यशोधक चळवळ, अस्पृश्यता निवारण यासारख्या कामात त्यांनी स्वतःला झोकून घेतले होते.

जंगल कामगार सरकारी सोसायटी, आदिवासी भूमीहीन मजुर व अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी त्यांनी अनेक सरकारी योजना राबविल्या.




## 'माझा खानदेश'... खानदेशच्या वैभवशाली इतिहासाची नव्या पिढीला ओळख

खानदेशचे मुखपत्र दैनिक 'आपला महाराष्ट्र' चा सुरुवातीपासून मी वाचक राहिलेलो आहे. डॉ.संजय ढोडरे यांची 'बहर' पुरवणीतील 'माझा खानदेश'ही लेख मालिकाही मी दर रविवारी न चुकता वाचत असतो...यातून खानदेशचा गतकाळातील वैभवशाली इतिहास, रूढी- परंपरा, श्रद्धास्थाने, यात्रा- सण- उत्सव, समाज राजकारण, चालीरीती, भाषा, बोलीभाषा, संस्कृती याविषयीची अद्ययावत व प्रमाणित अशी माहिती मिळत असते.गतकाळातील परंतु स्मृतीत सदैव अढळ स्थान असणाऱ्या विराट कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महान व्यक्तींचा कार्य परिचयही या लेख मालिकेतून मला होत आहे. खानदेशातील तेजस्वी,त्यागमय, जीवन ,सामाजिक सहिष्णूतावादी धार्मिक आचरण, सामाजिक ऐक्य, शैक्षणिक कार्य, सामाजिक ऐक्य तसेच स्वातंत्र्य प्राप्तीसाठी खानदेशातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान... या गोष्टी आजच्या व येणाऱ्या युवा पिढीला निश्चितच प्रेरणादायी ठरतील कशा आहेत. 'माझा खानदेश' ही लेखमाला डॉ.संजय ढोडरे यांनी यापुढेही अखंडितपणे सुरू ठेवावी... पुढील अंकासाठी लेखन कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा...!

**- डॉ.बी.एम.पाटील, कार्यालय अधीक्षक - अभय युवा कल्याण केंद्र, धुळे**

## खानदेशच्या अंतर्मनाचा प्रवास...'माझा खानदेश'

आपल्या रोजच्या ठराविक साच्यातून थोडक्यात 'कम्फर्ट झोन' मधून बाहेर पडून कुठे-कुठे केलेला प्रवास माणसाला जेवढा अनुभवांनी समृद्ध करतो, तितकाच अंतर्मनाचा प्रवास त्याला स्वतःविषयी, समाजाविषयी, आपल्या परिसराविषयी सखोल विचार करण्यास भाग पाडतो. आमचे मित्र डॉ.संजय ढोडरे यांचे लेखन कार्य अविरतपणे सुरू आहे.दैनिक आपला महाराष्ट्र 'बहर'पुरवणीतील 'माझा खानदेश' लेख मालिकेतील आतापर्यंतचे जवळपास ३० लेख खानदेशच्या अंतर्मनाचा प्रवास आहे. दर्दी- वाचकांना वेगळ्या जगात घेऊन जाणारी ही लेखमाला आहे. कारण खानदेश नावाच्या उत्पत्तीपासून ते आज तागायत पर्यंतची वाटचाल शब्दात मांडणे खूप मोठे आव्हानात्मक कार्य... बोलीभाषा, नाम चर्चा,प्राचीन खानदेशचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व येथील राजकीय राजवटी येथील भौगोलिक सौंदर्य ,राजघराणे व संस्थाने खानदेशचा सांस्कृतिक वारसा, वैभव ,समाज सुधारक त्यांनी उभारलेल्या विविध चळवळी- आंदोलने, अशाप्रकारे अतिशय अभ्यासपूर्ण आणि क्रमबद्ध मांडणी लेख मालिकेत आहे. भाषेवर प्रभुत्व ,शब्द समृद्धी- संपदा , लेखनातील तटस्थता, व्यक्तिगत तसेच व्यापक अनुभव विश्वाचा मेळ घालण्याची सोपी पद्धत ; यामुळे सर्व लेख वाचनीय झाले आहेत. एखाद्या जंगलात जाताना समोरची पायवाट हळूहळू दिसत जावी त्याचप्रमाणे 'माझा खानदेश' ची महती कळते. अलीकडे कुणीतरी म्हणाले की 'कृत्रिम बुद्धिमत्ता आहे, साहित्य क्षेत्रासाठी मोठे आव्हान आहे'... खरे तर कृत्रिम बुद्धिमत्ता सर्जनशील कामासाठी उपयुक्त नाही. साहित्यात नाविन्य आणणे कृत्रिम बुद्धीमत्तेला शक्य नाही. कलेत नेमके नाविन्य अपेक्षित असते आणि तेच डॉ. संजय ढोडरे यांनी बरोबर हेरले आहे. 'माझ्या खानदेश' लेखमालिकेचे उर्वरित लेख डॉ.संजय ढोडरे यांच्या लेखन प्रतिभेला अधिक उंचीवर घेऊन जाईल याची खात्री आहे. लेखमाला पूर्ण झाल्यावर आपण हे सर्व लेख एकत्रितरित्या संपादित करून एक सर्वोत्तम ग्रंथ प्रकाशित करावा.त्यामुळे एकाच ठिकाणी, एकाच नजरेत, एकाच ग्रंथात संपूर्ण खानदेश महिमा वाचता-पाहता-आत्मसात करता येईल आणि त्यातून विविध विषयांच्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी नव्या दिशा मिळतील. अनमोल खजिना 'माझा खानदेश' च्या पुढील अक्षर यात्रेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा...!

**- प्राचार्य डॉ.अरुण पाटील, सेवानिवृत्त, इतिहास विभाग प्रमुख,धुळे**

## 'माझा खानदेश'... खानदेश भूमीबद्दल माहितीचा एक अनमोल ठेवा

गेल्या चार दशकापासून मी 'आपला महाराष्ट्र' दैनिकाच्या 'बहर' पुरवणीचा वाचक- लेखक म्हणून जुळलेला आहे. दैनिक 'आपला महाराष्ट्र' च्या 'बहर'पुरवणीतील 'माझा खानदेश'लेख मालिकेत डॉ. संजय ढोडरे यांचे आज पर्यंत प्रकाशित झालेले लेख नव्या पिढीसाठी व संशोधकांसाठी ज्ञानवर्धक व आपल्या मायभूमीबद्दल कुठेही माहित नसलेल्या अज्ञात स्थळ व व्यक्तींची ओळख करून देणारे आहेत... यात तिळमात्र शंका नाही...म्हणून मी सुरुवातीलाच लेखक डॉ.संजय ढोडरे, दैनिक 'आपला महाराष्ट्र' चे संपादक श्री.हेमंत भाऊ मदाने , 'बहर' पुरवणीचे संपादक श्री.विकास कपोले यांचे अभिनंदन करतो की, त्यांनी एका चांगल्या विषयाला घेऊन ही लेखमालिका सुरू केली आहे. लेखमालिकेत खानदेश आणि त्यातील वैशिष्ट्ये तसेच काही अनभिज्ञ माहिती संदर्भ सह संशोधन करून मांडण्याचा चांगला प्रयत्न केलेला दिसून येतो. ....तसा मला पश्चिम महाराष्ट्रातील नंदुरबार ,तळोदा परिसरात वन विभागात नोकरी दरम्यान विविध ठिकाणी राहण्याचा योग आला. तळोद्यातील मेवासी वनविभागात देखील मी होतो, परंतु संस्थानिक परिमंडळ तसेच अंतर्भूत खानदेश विभाग मेवासी या शब्दाचा इतिहास व अर्थ मला माहिती होऊ शकला नव्हता. या लेख मालिकेतून अशा अनेक गोष्टींची उकल मला होऊ शकली. खानदेशातील महान व्यक्ती, समाज सेवक, समाज सुधारक, चळवळी यांच्या विषयी माहिती नसलेल्या गोष्टी मला कळाल्या. 'माझा खानदेश' लेखमाला एक मोठा माहितीचा अनमोल ठेवा आहे. त्यांची ही लेख शृंखला पुढेही अशीच सुरू ठेवावी ज्यातून नवनवीन माहिती माझ्यासारख्या वाचक- जिज्ञासू व्यक्तींना मिळत राहील.

**- श्री.अरुण राठोड जोहरी, साहित्यिक व सेवानिवृत्त लेखापाल, मेवासी वनविभाग , तळोदा**



सीए नरेंद्र नेरपगार
मो.९६७३७३०८९५

अर्थवेध

# आयकर कायद्यानुसार व्यवसायाच्या हिशोबाची पुस्तके ठेवणे कोणाला बंधनकारक आहे?

व्यवसायात नफा कमावणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्या नफ्याचा योग्य हिशोब ठेवणेही महत्त्वाचे आहे. अनेक व्यावसायिक आणि उद्योजक व्यवसाय सुरू करताना विक्री वाढविणे, ग्राहक मिळविणे आणि नफा कमावणे यावर भर देतात; परंतु व्यवसायाचे नियमित हिशोब, बिले, खर्चाच्या नोंदी आणि आर्थिक व्यवहारांची योग्य नोंद ठेवण्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. काही लहान व्यावसायिक तर आमचा व्यवसाय छोटा आहे, त्यामुळे आम्हाला हिशोबाची पुस्तके ठेवण्याची गरज नाही असा गैरसमज करून घेतात.

प्रत्यक्षात, आयकर कायद्यानुसार अनेक व्यवसायिक आणि व्यावसायिकांसाठी हिशोबाची पुस्तके ठेवणे बंधनकारक आहे. यामागील मुख्य उद्देश म्हणजे करदात्याचे वास्तविक उत्पन्न अचूकपणे निश्चित करणे आणि आयकर विभागाला आवश्यकतेनुसार ते पडताळून पाहता यावे. योग्य हिशोबामुळे केवळ करनिर्धारण सुलभ होत नाही, तर व्यवसायाचे आर्थिक नियोजन, बँक कर्ज, गुंतवणूक, लेखापरीक्षण आणि भविष्यातील विस्तार यासाठीही मोठी मदत होते.

आयकर कायदा, २०२५ मधील कलम ६२ मध्ये कोणत्या व्यक्तींनी हिशोबाची पुस्तके ठेवावीत, कोणत्या परिस्थितीत ती बंधनकारक होतात आणि कोणत्या व्यवसायांवर हा नियम लागू होतो याची सविस्तर तरतूद करण्यात आली आहे.

हिशोबाची पुस्तके ठेवण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे करदात्याचे एकूण उत्पन्न अचूकपणे निश्चित करता यावे. त्यामुळे आयकर अधिकाऱ्याला व्यवसायातील उत्पन्न, खर्च, मालसाठा, देणी, घेणी आणि इतर आर्थिक व्यवहारांची पडताळणी करणे शक्य होते.

**१. हिशोबाची पुस्तके ठेवणे खालीलविशिष्ट व्यवसायासाठी अनिवार्य आहेत: -**

वकील, डॉक्टर, अभियंता, वास्तुविशारद, अकाउंटंट, तांत्रिक सल्लागार, इंटिरिअर डेकोरेटर, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक, कंपनी सेक्रेटरी, चित्रपट कलाकार (चित्रपट उद्योगात व्यावसायिक म्हणून कार्य करणारी व्यक्ती) या व्यवसायांपैकी कोणत्याही व्यवसायातील व्यक्तीचीवार्षिक एकूण उलाढाल/प्राप्ती १,५०,००० पेक्षा जास्त असल्यास, त्या व्यक्तीने आयकर कायदा, २०२५ नुसार विहित हिशोबाची पुस्तके आणि आवश्यक कागदपत्रे ठेवणे अनिवार्य आहे.

**२. व्यक्ती आणि हिंदू अविभक्त कुटुंब इतर व्यवसायांसाठी विशेष मर्यादा:**

आयकर कायदा, २०२५ मध्ये व्यक्ती आणि हिंदू अविभक्त कुटुंब यांना विशेष सवलत देण्यात आली आहे. अशा करदात्यांच्या बाबतीत वरील मर्यादांऐवजी जास्त मर्यादा लागू होतात. त्यामुळे त्यांच्या व्यवसायाचे उत्पन्न २,५०,००० पेक्षा जास्त असेल किंवा व्यवसायाची एकूण विक्री, उलाढाल २५,००,००० पेक्षा जास्त असेल, तर त्यांना हिशोबाची पुस्तके ठेवणे बंधनकारक आहे.

ही विशेष मर्यादा फक्त Individual आणि HUF यांनाच लागू असून Firm, LLP, Company, AOP, BOI किंवा AJP यांना लागू होत नाही.

**३. भागीदारी संस्था, मर्यादित दायित्व भागीदारी, कंपनी, व्यक्तींची संघटना, व्यक्तींचा समूह, कृत्रिम न्यायिक व्यक्ती यांच्यासाठी मर्यादा:** या करदात्यांच्या बाबतीतहिशोबाची पुस्तके ठेवण्याबाबत स्वतंत्र वाढीव मर्यादा देण्यात आलेली नाही. त्यामुळे या करदात्यांच्या बाबतीत, मागील तीन कर वर्षांपैकी कोणत्याही एका वर्षात व्यवसायाचे उत्पन्न १,२०,००० पेक्षा जास्त असेल किंवा व्यवसायाची एकूण विक्री, उलाढाल अथवा स्थूल प्राप्ती १०,००,००० पेक्षा जास्त असेल, तर त्यांना आयकर कायदा, २०२५ नुसार विहित हिशोबाची पुस्तके ठेवणे बंधनकारक आहे.

**४. अनुमानित करप्रणाली स्वीकारल्यास हिशोबाची पुस्तके ठेवण्याची गरज असते का?**

आयकर कायद्यामध्ये काही पात्र करदात्यांसाठी अनुमानित करप्रणाली उपलब्ध आहे. या योजनेचा पर्याय स्वीकारल्यास करदात्याला नियमित हिशोबाची सर्व पुस्तके ठेवण्याची आवश्यकता नसते. कारण या योजनेत व्यवसायाचा नफा कायद्यानुसार निश्चित टक्केवारीने गृहीत धरून आयकराची गणना केली जाते.

तथापि, याचा अर्थ व्यवसायाच्या कोणत्याही नोंदी ठेवण्याची गरज नाही, असा होत नाही. करदात्याने व्यवसायाशी संबंधित विक्री, खरेदी, पावत्या, बिले, बँक व्यवहार आणि इतर आवश्यक आर्थिक नोंदी जतन करून ठेवणे हितावह व आवश्यक आहे. या नोंदी भविष्यात आयकर विभागाकडून चौकशी झाल्यास किंवा व्यवसायाची उलाढाल सिद्ध करण्यासाठी उपयुक्त ठरतात.

**५. कलम ६२ आणि आयकर नियमांनुसार कोणती हिशोबाची पुस्तके ठेवणे आवश्यक आहे?**

आयकर अधिनियम, २०२५ मधील कलम ६२ आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या आयकर नियमांनुसार, करदात्याने त्याच्या व्यवसायाचे किंवा व्यावसायिक उत्पन्नाचे अचूक निर्धारण करता यावे यासाठी आवश्यक हिशोबाची पुस्तके आणि कागदपत्रे ठेवणे बंधनकारक आहे. यामध्ये रोकड वही, जर्नल (मर्कन्टाईल पद्धतीने हिशोब ठेवत असल्यास), लेजर, अनुक्रमांकित विक्री बिले व पावत्यांच्या प्रती, खरेदीची मूळ बिले, खर्चाची बिले व व्हाउचर्स (बिल उपलब्ध नसल्यास योग्य तपशीलासह तयार केलेले व्हाउचर्स), नफा-तोटा खाते आणि ताळेबंद यांचा समावेश होतो. तसेच, करदात्याच्या व्यवसायाच्या स्वरूपानुसार स्टॉक रजिस्टर, वेतन नोंदवही, कराशी संबंधित नोंदी, बँक व्यवहारांची नोंद, देणी-घेणीची नोंद तसेच इतर आवश्यक अभिलेख देखील ठेवणे आवश्यक असू शकते.

**६. हिशोबाची पुस्तके किती काळ जतन करून ठेवावीत?**

आयकर अधिनियम, २०२५ अंतर्गत नियम ४६(९) नुसार, हिशोबाची पुस्तके, बिले, व्हाउचर्स आणि इतर आवश्यक कागदपत्रे संबंधित कर वर्ष संपल्यानंतर सात (७) कर वर्षे जतन करून ठेवणे बंधनकारक आहे. तसेच, जर एखाद्या कर वर्षाचे मूल्यांकन किंवा पुनर्मूल्यांकन पुन्हा सुरू करण्यात आले असेल, तर त्या कर वर्षाशी संबंधित सर्व हिशोबाची पुस्तके आणि कागदपत्रे सदर मूल्यांकनाची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत जतन करून ठेवणे आवश्यक आहे.


**७. कलम ६२नुसार लेखा नोंदी न ठेवल्याबद्दल दंड :-**

कलम ४४१ नुसार, करदात्याने कलम ६२ किंवा त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांचे पालन न केल्यास किंवा आवश्यक हिशोबाची पुस्तके, कागदपत्रे व अभिलेख विहित कालावधीपर्यंत जतन करून ठेवले नसल्यास, निर्धारण अधिकारी यांच्याकडून २५,००० पर्यंत दंड आकारला जाऊ शकतो.

याशिवाय, आवश्यक हिशोबाची पुस्तके उपलब्ध नसल्यास किंवा अपूर्ण असल्यास, आयकर विभागाला करदात्याचे उत्पन्न उपलब्ध माहिती व पुराव्यांच्या आधारे निश्चित करण्याचा अधिकार असू शकतो. त्यामुळे प्रत्येक करदात्याने केवळ हिशोबाची पुस्तके ठेवणेच नव्हे, तर ती आयकर नियमांमध्ये नमूद केलेल्या कालावधीपर्यंत सुरक्षित जतन करून ठेवणेही तितकेच आवश्यक आहे.

आयकर अधिनियम, २०२५ अंतर्गत हिशोबाची पुस्तके ठेवण्याची तरतूद ही केवळ आयकराच्या उद्देशाने आहे. तथापि, करदात्याच्या व्यवसायाचे स्वरूप, कायदेशीर रचना आणि नोंदणीच्या प्रकारानुसार इतर अनेक कायद्यांमध्येही हिशोबाची पुस्तके ठेवणे बंधनकारक असू शकते. त्यामुळे एखाद्या करदात्याला आयकर अधिनियमांतर्गत पुस्तके ठेवण्याची सक्ती नसली, तरी इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार त्याला आवश्यक हिशोबाची पुस्तके आणि अभिलेख ठेवावे लागू शकतात.

उदाहरणार्थ, वस्तू व सेवा कर कायदा अंतर्गत नोंदणीकृत करदात्यांनी GST नियमांनुसार आवश्यक हिशोबाची पुस्तके आणि नोंदी ठेवणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत प्रत्येक कंपनीने विहित लेखा पुस्तके आणि आर्थिक अभिलेख ठेवणे आवश्यक आहे. भारतीय मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८अंतर्गत LLP ला देखील योग्य लेखा नोंदी ठेवाव्या लागतात. तसेच सार्वजनिक ट्रस्ट, धर्मादाय संस्था, सहकारी संस्था, सोसायटी किंवा इतर विशेष कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत संस्थांनाही संबंधित कायद्यांनुसार हिशोबाची पुस्तके ठेवण्याची जबाबदारी असते.




# प्रश्नांच्या पाऊलवाटेवर

आजोबा होण्याचा आनंद शब्दांत सांगणे कठीण आहे. आयुष्याच्या या टप्प्यावर माणूस पुन्हा एकदा बालपण अनुभवू लागतो. चैतन्य आणि चिन्मय या माझ्या जुळ्या नातवंडांमुळे माझ्या आयुष्यात हा आनंद रोज नव्याने उमलतो. त्यांच्या सहवासात प्रत्येक दिवस नवीन असतो, प्रत्येक क्षण शिकवणारा असतो आणि प्रत्येक प्रश्न मनाला विचार करायला भाग पाडणारा असतो.

मी आणि आजी गावाला निघालो की दोघेही आमचे कायमचे सहप्रवासी असतात. गावाकडे जाण्याचा प्रवास म्हणजे त्यांच्यासाठी आनंदाचा सोहळाच असतो. रस्त्यावरची झाडे, डोंगर, पूल, नदी, ट्रॅक्टर, बस, गुरांचे कळप प्रत्येक गोष्ट ते कुतूहलाने पाहतात. त्यांना प्रत्येक गोष्टीबद्दल प्रश्न पडतात आणि त्या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत त्यांची जिज्ञासा शांत होत नाही.

नेपाळमध्ये एका शैक्षणिक परिषदेसाठी आम्हाला चौदा दिवस जावे लागले. या वेळी मात्र त्यांना सोबत नेता आले नाही. मनाने आम्हालाही ते जड गेले. प्रवासभर त्यांच्या आठवणी येत राहिल्या. परत आलो तेव्हा त्यांनी धावत येऊन मिठी मारली; पण त्या मिठीत एक छोटासा रुसवाही दडला होता.

बाबा, यापुढे आम्हाला न घेता गावाला जायचंच नाही!

त्यांच्या त्या निरागस वाक्याने मन भरून आले. त्यांना गावाचे आकर्षण नव्हते; त्यांना आमच्यासोबत राहायचे होते. त्या दिवशी जाणवले की मुलांसाठी माणसे महत्त्वाची असतात, ठिकाणे नाहीत.

नंतर पुण्याला जाण्याचा योग आला. यावेळी त्यांच्या शाळा सुरू होत्या. त्यांच्या आईने अगदी योग्य निर्णय घेतला. शाळेचा खंड पडायला नको, असे म्हणत तिने त्यांना घरीच ठेवले. आता ते चार वर्षांचे झाले होते. त्यांचे बोलणे अधिक स्पष्ट झाले होते. निरीक्षणशक्ती वाढली होती. प्रत्येक गोष्ट समजून घेण्याची त्यांची धडपड पाहताना मला माझ्या शिक्षकपणाची आठवण यायची.

बसस्थानकावर आम्ही उभे होतो. समोर नवीन, उंच आणि आकर्षक बस उभी होती. दोघेही तिच्याकडे एकटक पाहत होते. थोड्याच वेळात चिन्मयने माझा हात धरला आणि म्हणाला,

बाबा, बसचे टायर आपल्या गाडीपेक्षा एवढे मोठे का असतात?

हा प्रश्न ऐकताच माझ्या चेहऱ्यावर हसू आले. मी त्याला जवळ घेत म्हणालो, आपल्या गाडीत चार-पाच माणसे बसतात; पण बसमध्ये पन्नास-साठ माणसे बसतात. त्यामुळे तिचे वजन खूप जास्त असते. ते वजन सुरक्षितपणे पेलण्यासाठी मोठे आणि मजबूत टायर लागतात. मोठ्या टायरमुळे बसचा तोल चांगला राहतो, रस्त्यावर पकड मिळते आणि प्रवास सुरक्षित होतो.

मी त्यांना चाकाचा आकार, वजनाचे संतुलन, हवेचा दाब अशा काही सोप्या वैज्ञानिक गोष्टीही सांगितल्या. ते दोघे डोळे मोठे करून ऐकत होते. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान मला एका शिक्षकाला मिळणाऱ्या समाधानासारखे वाटले.

त्या दिवशी मला पुन्हा जाणवले की जिज्ञासा हीच शिक्षणाची खरी सुरुवात आहे. पुस्तकातील धडा नंतर येतो; आधी प्रश्न जन्माला येतो.

अलीकडे माझा एक सुंदर दिनक्रम तयार झाला आहे. सकाळी त्यांना शाळेत सोडणे आणि दुपारी शाळा सुटल्यानंतर घरी आणणे. त्यांच्या बॅगा उचलणे, पाण्याच्या बाटल्या भरून देणे, नवीन कपडे, बूट, वह्या, पुस्तके किंवा शाळेसाठी लागणाऱ्या




वस्तू आणणे-ही सर्व कामे मी आनंदाने करतो. या कामांमध्ये कर्तव्यापेक्षा प्रेम जास्त आहे.

त्या दिवसांत आम्ही पुण्यात होतो; पण साक्रीमध्ये पावसाने जोर धरला होता. गावाकडून मुसळधार पावसाच्या बातम्या येत होत्या. पावसाळा लक्षात घेऊन त्यांच्या आईने दोघांसाठी नवीन रेनकोट घेतले. तिचा विचार दूरचा होता. मुलं झपाट्याने वाढतात. म्हणून रेनकोट थोडा मोठा घेतला, तर पुढच्या वर्षीही तो वापरता येईल.

शाळेत जाताना गाडीवर बसल्याबसल्या चिन्मय म्हणाला,

बाबा, मम्मीने रेनकोट घेतला पण तो खूप मोठा आहे.

त्याच्या आवाजात नाराजी नव्हती; फक्त निरीक्षण होते. त्याच्या दृष्टीने रेनकोट म्हणजे आज वापरण्याची वस्तू. तो आजच अगदी मापाचा हवा. पुढच्या वर्षाचा विचार त्याच्या बालविश्वात अजून आला नव्हता.

मी हसून म्हणालो, आज तुला तो मोठा वाटतो आहे. पण पुढच्या वर्षी तूही मोठा होशील. मग हाच रेनकोट तुला अगदी मापाचा बसेल. मम्मीने तो मोठा घेतला, कारण तिला माहिती आहे की माझा चिन्मय रोज थोडा-थोडा मोठा होत आहे.

तो काही क्षण शांत राहिला. मग स्वतःच्या हातांकडे पाहिले, रेनकोटकडे पाहिले आणि हसला. त्या हसण्यात उत्तर स्वीकारल्याचे समाधान होते.

त्या दिवशी मला दोन पिढ्यांमधील विचारांचा फरक स्पष्ट दिसला. मुलं वर्तमानात जगतात. त्यांच्यासाठी आजचा दिवसच खरा असतो. मोठी माणसे मात्र उद्याचाही विचार करतात.

(पान ६ वर)

## शब्दझुला



### मुलगी शिकली, प्रगती झाली

शिकली लेक, घर शिकलं,
जग सगळं उजळून निघलं ।
पुस्तकी–स्वप्न तिला जमलं,
तिचं देशाचं शान बनलं ।।ध्रु।।
तेल–वात होऊनी,
ज्ञान ज्योत पेटली..।
दगड धोंडे झेलुनी,
लेकींना शाळा भेटली..।।
होते जरी अंधश्रध्देचे वादळ,
होता अविचारांचा गोंधळ..।
सोबतीला ज्योतिबा–भारी,
विझल न कधी ज्ञान दारी..।।
शाहू राजाने दिला आधार,
भीमानेही दिला आकार.. ।
शिका–संघटित व्हा गर्जना,
तीच आमुच्या जीवनाची
अर्चना..।।
शाळेच्या लेकींनो ऐका गं,
तुम्हीच उद्याची ज्वाला गं..।
पेन – वही आमुचा श्वास,
आत्मनिर्भर भारताचा
ध्यास..।।
मुलगी शिकली तरच खरं,
होईल देशाचं नवं सारं..।
जरा तिला पंख देऊन,
भरारी घेईल ऊंच गगन..।।

– प्रभाकर भामरे,
मेहेरगाव मो.९४२०३ ७३२६१



### देशभक्ती गीत

चला तिरंगा ध्वज फडकवू
स्वातंत्र्याची मशाल पेटवू
चला तिरंगा ध्वज फडकवू।।धृ।।
देश रक्षणा सैनिक लढले
देशासाठी प्राणार्पण केले
त्या वीरांना मानवंदना देऊ
चला तिरंगा ध्वज फडकवू
।।१।।
सभ्य संस्कृतीचा देश आमचा
जगात ख्याती रुढी परंपरेचा
आदरभाव सर्वाप्रती ठेवू
चला तिरंगा ध्वज फडकवू
।।२।।
जात धर्माच्या दर्या मिटवू
भेद विसरून एकसंघ होऊ
अखंड भारत समतेत राहू
चला तिरंगा ध्वज फडकवू
।।३।।
भारत आमचा देश महान
गाऊ त्याचे गीत गुणगान
खेळ जिंकून पदके मिळवू
चला तिरंगा ध्वज फडकवू
।।४।।

– चंद्रशेखर कासार
चांदवडकर, धुळे.
७५८८३१८५४३

### उठा पुन्हा एकदा

९ ऑगस्टची ती
रात्र आठवते
गांधींचा नारा
काळजाला भिडते
भारत छोडो घुमला आकाशी
रक्ताने लिहिला इतिहास
नव्याशी ।। ध्रु।।
बेड्या तोडल्या,
तुरुंग झुगारले ।
तरुणांनी मरणाला
कवटाळले ।
लाठी खाल्ली पण
झुकले नाहीत ।
स्वातंत्र्याशिवाय
थांबले नाहीत ।
त्या त्यागाची किंमत
आज कळते का? ।।१।।
आजही गुलामी दुसऱ्या
रूपात आहे ।
आळस, भ्रष्टाचार,
स्वार्थाच्या बाहेत ।
देश लुटतोय आतून
बाहेरून ।
आपण गप्प का
बसलोय म्हणून? ।
उठा पुन्हा एकदा,
भारत घडवूया ।।२।।
प्रभाकर बोले ऐका
रे माणसा ।
स्वातंत्र्य म्हणजे फक्त
झेंडा नसतो ।
कर्तव्याची जाणीव
जागी ठेवणे ।
पत्रकाराचे देशासाठी
जगणे आणि मरने ।
हेच खरे भारत छोडो
चे ब्रीद असतो ।।३।।
९ ऑगस्ट विसरू नका हो
शहीदांचे स्वप्न जपूया हो ।
जय हिंद म्हणत
कंबर कसूया ।
नवा भारत पुन्हा
उभारूया ।।४।।
वंदे मातरम! जय हिंद!

– प्रभाकर भामरे,
मेहेरगाव मो.९४२०३ ७३२६१



### प्रीतार्थ

निवांत एकांतात
मी इप्सीत शोधतो
निष्पाप काळजात
तुलाच कुरवाळतो
क्षण तेच सांत्वनी
शब्दातुनी गुंफितो
प्रीतार्थातली गीता
मनश्रावण भासतो
मन भिजे चिंबचिंब
जीव व्याकुळ होतो
लाभण्या तुझाच संग
आत्माच अधीर होतो

– वि.ग.सातपुते

### दखनी बालकविता
### मोबाईल चाचा

मोबाईल चाचा भोतीच अच्छे
उससे उनपर खुश सब बच्चे
मिट्टे बातां करने आते
मेसेज लेने देने आते
सर्च करे की मिलता ज्ञान
हुई पडाई अब आसान
खरीदो या करो तुम सेल
खाना मंगावो मंगावो भेल
अलग अलगसे खेलो खेल
एक मिंनटमें भेजो ईमेल
कामा हुये सब आसान
बना मोबाईल सबकी जान
दोस्त बन गया मोबाईल
उस बगैर नई लगता दिल
ऑनलाइन अब चालू पढाई
इस्कुलच चलते घर आई
गाके मोबाईल का गान
चलो छुइंगे अब आसमान

– डी. के. शेख
मो. ९५५२८४३३६५

## प्रश्नांच्या पाऊलवाटेवर

(पान ५ वरुन) म्हणूनच आईला रेनकोट पुढच्या वर्षीही उपयोगी पडावा असे वाटते, आणि मुलाला तो आजच मापाचा हवा असतो. दोघेही चुकीचे नसतात; फक्त त्यांच्या जगण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. बसच्या टायरांचा प्रश्न असो किंवा रेनकोटाचा-दोन्ही प्रसंगांनी मला एकच शिकवण दिली. मुलांच्या प्रश्नांना कधीही क्षुल्लक समजू नये. त्या प्रश्नांमध्ये त्यांच्या विचारविश्वाची दारे उघडत असतात. योग्य उत्तर मिळाले, तर त्या दारातून ज्ञान आत येते; चुकीची प्रतिक्रिया मिळाली, तर कुतूहलाचा दिवा विझण्याचीही शक्यता असते.


शिक्षक म्हणून आयुष्यभर हजारो विद्यार्थ्यांना शिकवले. पण आजोबा झाल्यानंतर मला समजले की शिकवण्यापेक्षा ऐकणे अधिक महत्त्वाचे असते. मुलं प्रश्न विचारतात तेव्हा ती फक्त माहिती मागत नसतात; ती आपल्याशी संवाद साधत असतात. त्या संवादातून विश्वास निर्माण होतो, विचार वाढतात आणि नात्यांमध्ये ऊब निर्माण होते.

आज चैतन्य आणि चिन्मयचे प्रश्न मला रोज नव्याने शिकवत आहेत. त्यांच्या प्रत्येक प्रश्नामुळे मीही पुन्हा विद्यार्थी होतो. त्यांच्या डोळ्यांतून जग पाहताना साध्यासाध्या गोष्टींचेही नवे अर्थ सापडतात.

म्हणूनच आजोबांच्या डायरीत आजची ही नोंद करून ठेवतो-मुलांना आपण दिलेली प्रत्येक वस्तू ते कधीतरी विसरतील; पण त्यांच्या प्रश्नांना आपण दिलेला वेळ, संयम आणि प्रेमळ उत्तरे ते आयुष्यभर लक्षात ठेवतील. कारण प्रश्न हेच ज्ञानाच्या प्रवासाची पहिली पायरी असतात.


---

आरोग्यम् धनसंपदा



डॉ.रोहन कुलकर्णी
MBBS, MD Medicine, IDCCM
कन्सल्टिंग फिजिशियन, इंटेंसिविस्ट
धुळे मो.९५०३४२०५१२

# दूषित पाण्यामुळे होणारा टायफॉईड : पावसाळ्यातील शांत पण धोकादायक संसर्ग



### प्रस्तावना

पावसाळ्यात दूषित पाणी आणि अस्वच्छ अन्नामुळे होणाऱ्या आजारांमध्ये टायफॉईड (मुदतीचा ताप) हा एक महत्त्वाचा संसर्गजन्य आजार आहे. अनेकदा सुरुवातीला साधा ताप समजून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र योग्य वेळी निदान आणि उपचार न झाल्यास हा आजार आतडे, यकृत आणि इतर अवयवांवर गंभीर परिणाम करू शकतो. स्वच्छ पाणी, योग्य स्वच्छता आणि वेळेवर उपचार हेच टायफॉईडपासून बचावाचे सर्वात प्रभावी उपाय आहेत.

### हा विषय सध्या महत्त्वाचा का?

सध्या पावसाळ्यामुळे अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे स्रोत दूषित होण्याचा धोका वाढतो. पाणीपुरवठ्याच्या पाइपलाईनमध्ये गळती, पूरस्थिती, उघड्यावरचे अन्न आणि अस्वच्छ हातांमुळे टायफॉईडचे प्रमाण वाढू शकते. त्यामुळे या काळात विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.

### कारणे

टायफॉईड हा डश्रोपशश्रश्रर द्गूहिळ या जीवाणूमुळे होतो. हा संसर्ग मुख्यतः मलाने दूषित झालेले पाणी किंवा अन्न खाल्ल्याने किंवा प्यायल्याने होतो.

### मुख्य कारणे:

- दूषित पिण्याचे पाणी
- उघड्यावर विकले जाणारे अस्वच्छ अन्न
- हात न धुता अन्न सेवन करणे
- दूषित बर्फ किंवा थंड पेये
- टायफॉईड झालेल्या व्यक्तीकडून अन्न तयार होणे

### लक्षणे

टायफॉईडची लक्षणे हळूहळू वाढतात.

- सलग ५-७ दिवस किंवा त्याहून अधिक काळ ताप
- डोकेदुखी
- अशक्तपणा
- भूक कमी लागणे
- पोटदुखी
- बद्धकोष्ठता किंवा जुलाब
- मळमळ किंवा उलट्या
- काही रुग्णांमध्ये शरीरावर गुलाबी रंगाचे छोटे पुरळ

### कोणाला जास्त धोका?

- दूषित पाणी पिणारे नागरिक
- लहान मुले
- विद्यार्थी व वसतिगृहात राहणारे
- रस्त्यावरील अन्न वारंवार खाणारे
- कमी प्रतिकारशक्ती असलेले रुग्ण
- पूरग्रस्त भागातील रहिवासी

### परिणाम व गुंतागुंत
### उपचार उशिरा झाल्यास:

- आतड्याला छिद्र पडणे (Intestinal perforation)
- आतड्यातून रक्तस्राव
- तीव्र निर्जलीकरण
- मेंदूवर परिणाम (Delirium)
- सेप्सिस (रक्तातील गंभीर संसर्ग)
- क्वचित प्रसंगी मृत्यू

धोक्याची चिन्हे

### खालील लक्षणे दिसल्यास तातडीने रुग्णालयात जा:

- ताप ५ दिवसांपेक्षा जास्त टिकणे
- तीव्र पोटदुखी
- रक्तमिश्रित शौच
- सतत उलट्या
- बेशुद्धपणा किंवा गोंधळ
- लघवी कमी होणे

### निदान व तपासण्या

डॉक्टर रुग्णाची लक्षणे आणि तपासणी करून आवश्यक चाचण्या सुचवतात.

- रक्त संस्कृती (Blood Culture) - सुरुवातीच्या काळात सर्वात उपयुक्त
- उइउ
- आवश्यकतेनुसार इतर रक्त तपासण्या
- काही परिस्थितीत मल किंवा मूत्र संस्कृती
- विडाल (Widal) चाचणी काही ठिकाणी केली जाते; मात्र तिचे निष्कर्ष मर्यादित असू शकतात. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार योग्य चाचणी निवडणे महत्त्वाचे आहे.

### उपचार

- डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार योग्य प्रतिजैविक (Antibiotics)
- पुरेसे पाणी आणि द्रवपदार्थ
- तापासाठी योग्य औषधे
- पौष्टिक व सहज पचणारा आहार
- गंभीर रुग्णांना रुग्णालयात दाखल करून शिरेतून द्रवपदार्थ आणि इतर आवश्यक उपचार दिले जातात.

स्वतःहून अँटिबायोटिक सुरू करू नका किंवा मध्येच बंद करू नका, कारण त्यामुळे औषधांना प्रतिकार (Antibiotic Resistance) वाढू शकतो.

### घरच्या घरी काळजी

- उकळून किंवा शुद्ध केलेले पाणीच प्या.
- पूर्ण विश्रांती घ्या.
- खिचडी, डाळ-भात, सूप यांसारखा हलका आहार घ्या.
- डॉक्टरांनी दिलेला औषधांचा पूर्ण कोर्स पूर्ण करा.
- ताप कमी झाला म्हणून औषधे थांबवू नका.

### प्रतिबंधात्मक उपाय

- उकळलेले किंवा फिल्टर केलेले पाणी प्या.
- जेवणापूर्वी आणि शौचानंतर साबणाने हात धुवा.
- उघड्यावरचे अन्न टाळा.
- फळे व भाज्या स्वच्छ धुवून वापरा.
- घरातील पाण्याच्या टाक्या नियमित स्वच्छ करा.
- आवश्यकतेनुसार टायफॉईड लस डॉक्टरांच्या सल्ल्याने घ्या.

### गैरसमज विरुद्ध सत्य

गैरसमजः प्रत्येक ताप म्हणजे टायफॉईड.

सत्यः तापाची अनेक कारणे असतात. योग्य तपासणीशिवाय निष्कर्ष काढू नये.

गैरसमजः ताप उतरला म्हणजे औषधे बंद करावी.

सत्यः अपूर्ण उपचारामुळे आजार पुन्हा होऊ शकतो आणि औषधांना प्रतिकार निर्माण होऊ शकतो.

गैरसमजः फक्त घाणेरड्या पाण्यामुळेच टायफॉईड होतो.

सत्यः दूषित अन्न, बर्फ, पेये आणि संक्रमित व्यक्तीकडून तयार केलेले अन्नही संसर्ग पसरवू शकते.

### डॉक्टरांचा सल्ला

पाच दिवसांपेक्षा जास्त काळ ताप असल्यास स्वतः औषधे घेत बसू नका. योग्य तपासणी करून कारण निश्चित करणे आवश्यक आहे. विशेषतः पावसाळ्यात टायफॉईड, डेंग्यू, मलेरिया आणि लेप्टोस्पायरोसिस यांचा विचार करून डॉक्टर योग्य तपासण्या सुचवतात.

### भारत व जगातील परिस्थिती

भारतामध्ये दरवर्षी हजारो टायफॉईड रुग्ण आढळतात, विशेषतः ज्या भागांत स्वच्छ पाणी आणि स्वच्छतेची सुविधा अपुरी आहे. जगभरातही टायफॉईड हा सार्वजनिक आरोग्याचा महत्त्वाचा प्रश्न आहे. सुरक्षित पाणीपुरवठा, स्वच्छता आणि लसीकरणामुळे या आजाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी करता येते.

५ झटपट आरोग्य टिप्स

१. फक्त उकळलेले किंवा शुद्ध केलेले पाणी प्या.

२. ताप पाच दिवसांपेक्षा जास्त राहिल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.

३. रस्त्यावरील कापलेली फळे आणि उघड्यावरचे अन्न टाळा.

४. हात धुण्याची सवय लावा.

५. डॉक्टरांनी सांगितलेला अँटिबायोटिक कोर्स पूर्ण करा.

### निष्कर्ष


टायफॉईड हा पूर्णपणे टाळता येण्याजोगा संसर्गजन्य आजार आहे. सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता, योग्य हात धुण्याची सवय आणि वेळेवर उपचार यामुळे हा आजार सहज नियंत्रणात ठेवता येतो. पावसाळ्यात प्रत्येक दीर्घकाळ टिकणाऱ्या तापाकडे गांभीर्याने पाहा आणि विलंब न करता वैद्यकीय सल्ला घ्या. स्वच्छ पाणी हीच टायफॉईडविरुद्धची सर्वात प्रभावी लस आहे.

---

## जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने

### जल, जंगल, जमीन आणि निसर्ग हीच आमची ओळख

९ ऑगस्ट हा दिवस केवळ उत्सवाचा नाही, तर आपल्या पूर्वजांच्या परंपरा, संस्कृती, अस्मिता आणि निसर्गाशी असलेल्या अतूट नात्याला वंदन करण्याचा दिवस आहे. आदिवासी समाजाने हजारो वर्षांपासून निसर्गालाच देव मानले आहे. पर्वत, नद्या, झाडे, वन्यजीव आणि संपूर्ण सृष्टीचे जतन करणे हीच आपली खरी संस्कृती आहे. या दिवशी प्रत्येक आदिवासी बांधवांनी आपल्या पारंपरिक वेशभूषेत सहभागी व्हावे. ढोल, तुर, तारपा, पावी, तुंबडा यांसारख्या पारंपरिक वाद्यांच्या सुरात आपल्या संस्कृतीचा अभिमान व्यक्त करावा. ही वाद्ये आपल्या सुख-दुःखाची साक्षीदार आहेत. त्यामुळे ध्वनीप्रदूषण करणाऱ्या आधुनिक वाद्यांपेक्षा आपल्या परंपरेचा सन्मान राखणाऱ्या पारंपरिक वाद्यांनाच प्राधान्य द्यावे.



जागतिक आदिवासी दिन हा कोणत्याही राजकीय मतभेदांचा दिवस नाही. हा एकतेचा, बंधुभावाचा आणि समाजाला जोडण्याचा दिवस आहे. आपण सर्वांनी मतभेद विसरून एकत्र यावे आणि आपल्या संस्कृतीचा गौरव करावा. आजच्या युवक-युवतींवर मोठी जबाबदारी आहे. आधुनिक शिक्षण घेऊन विज्ञान, शेती, उद्योग, प्रशासन, वैद्यकीय, तंत्रज्ञान आणि इतर सर्व क्षेत्रांत यश मिळवा; पण आपल्या संस्कृतीची, मातृभाषेची आणि परंपरेची ओळख कधीही विसरू नका. पुढील पिढीला आपल्या इतिहासाची, संस्कृतीची आणि निसर्गप्रेमाची प्रेरणा द्या. या दिवशी आपण निसर्गपूजन करूया, वृक्षारोपण करूया, पर्यावरण संवर्धनाची शपथ घेऊया आणि एकमेकांचे हात धरून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्य करूया. कारण आदिवासी संस्कृती आपल्याला निसर्गावर प्रेम करायला, एकमेकांचा सन्मान करायला आणि सामूहिक विकासाचा मार्ग दाखवते. चला, ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिवस पारंपरिक पद्धतीने, अभिमानाने आणि एकतेच्या भावनेने साजरा करूया. आपल्या संस्कृतीचा वारसा जपूया, निसर्गाचे रक्षण करूया आणि येणाऱ्या पिढीसाठी समृद्ध, सशक्त आणि स्वाभिमानी आदिवासी समाज घडवूया. जागतिक आदिवासी दिनाच्या सर्व आदिवासी बांधवांना हार्दिक शुभेच्छा....!

- राजेंद्र वसावे
मशरूम शेती व्यवसायिक मार्गदर्शक,
आदिवासी भूषण पुरस्कार प्राप्त, कालो
कुणबी सेवाभावी संस्था टीम

---



सुमेध रानडे
मो.९५६१०९३७४०

## राशी भविष्य

**मेषः** हा सप्ताह तुमच्यासाठी खोळंबलेला काळ घेऊन येत आहे. गोष्टी अडकल्यासारख्या वाटतील. पटापट काही घडणार नाही. त्यामुळे तुम्हाला बेचैन वाटू शकतं. कामाच्या ठिकाणी तेच तेच काम करुन कंटाळा येण्याचा संभव आहे. मनातून उत्साह कमी राहील. या आठवड्यात तुम्ही तुमच्याकडे जे चांगलं आहे, त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. जे नाही त्यामुळे स्वतःला त्रास करुन घेण्यापेक्षा आहे त्यात आनंद मानायला शिका. इतरांमुळे तुम्हाला त्रास होत असेल तर संयम ठेवा, माणसं आणि नाती पटकन तोडायला जाऊ नका.

**वृषभः** हा सप्ताह तुमच्यासाठी मिश्र स्वरूपाचा असणार आहे. तुमच्या ध्येयापर्यंत पोचाल पण तरीसुद्धा समाधान वाटणार नाही. आणखी पुढे काहीतरी करायला हवं अशी भावना येईल. भौतिक सुखसोयींपासून एक प्रकारची विरक्ती येऊ शकते. कामामध्ये विलंब होऊ शकतो. एखादं अवघड ध्येय साध्य करण्याच्या दिशेने पाऊल टाकाल! या आठवड्यात खरंच तुम्हाला नक्की काय हवं आहे, याचा नीट विचार करा आणि त्याप्रमाणे पुढे चाला. उथळ गोष्टींमध्ये अडकून राहू नका. भावनांमध्ये, भूतकाळात किंवा नैराश्यात अडकून राहू नका. उपासना किंवा मेडिटेशन करा, एकांतात वेळ घालवा.

**मिथुनः** हा सप्ताह तुमच्यासाठी नवीन उमेद घेऊन येत आहे. मागचं विसरून नवीन सुरुवात करण्यासाठी तयार रहा. एक प्रसन्न आणि उत्साहवर्धक घटना घडू शकते. चांगला सकारात्मक बदल घडू शकतो. तुमचा आत्मविश्वास वाढेल. नवीन संकल्पना सुचतील. नवीन बदल घडतील. या आठवड्यात तुमच्या मनात सुरू असलेले विचार आणि कल्पना लोकांपर्यंत पोचवा. सृजनशीलता बाळगा, वेगळ्या पद्धतीने काम करा. बदल घडत असतील तर ते स्वीकारा. आळस सोडलात तर उन्नती होईलच. केल्यानेच होत आहे आधी केलेची पाहिजे! हे लक्षात ठेवा!

**कर्कः** हा सप्ताह तुमच्यासाठी मध्यांतराचा आहे. खूप कष्ट करुन, बरेच अडथळे ओलांडून तुम्ही एका टप्प्यावर येऊन पोचल्याने आता तुम्हाला थोडा वेळ तरी आरामाची गरज वाटणार आहे. कामे संथपणे होतील. अपेक्षित उत्तरं, अपेक्षित प्रतिसाद मिळणार नाही. एका जागी थांबून रहाल. पण चुकीचे वळण घेण्यापेक्षा आहे तिथे थांबणे योग्य असते! या आठवड्यात तुम्हाला काही प्रमाणात विश्रांती घेण्याची गरज आहे. धावाधाव थांबवा. जमेल तेवढंच काम करा, दडपण घेऊ नका. अतिविचार टाळा. प्रकृतीकडे लक्ष द्या. ध्यान मेडिटेशनचा तुम्हाला चांगला फायदा होईल!




**सिंहः** हा सप्ताह तुमच्यासाठी काहीतरी नवीन करून दाखवण्याचा आहे. नवीन काम मिळू शकतं. कामात बदल घेऊ शकतात. आत्तापर्यंत ज्याची वाट पाहत होता, ती घटना घडू शकते, किंवा त्या घटनेसंदर्भात चांगली बातमी मिळू शकते. केलेली मेहनत फलित होईल. तुम्हाला आतून ऊर्जा मिळेल, जिद्द राहील, उत्साही वाटेल. सकारात्मक वाटचाल होईल. या आठवड्यात तुम्ही एखादा प्रयोग, एखादं नवखं काम हाती घेऊ शकता. तुमची कला, क्रीडा, छंद लोकांसमोर सादर करा. विनम्रपणे, पाय जमिनीवर ठेवून इतरांसमोर व्यक्त व्हा.

**कन्याः** हा सप्ताह तुमच्यासाठी एक पर्याय निवडीचा आणि त्यावर ठाम राहण्याचा असणार आहे. तुम्हाला दिलेलं काम पार पाडण्यात तुमचा कस लागेल. केलेल्या कष्टांना काही प्रमाणात यश मिळेल. इतरांकडून मदतीचा हात मिळेल. कोणत्याही नात्यात दुरावा आला असेल तर त्यात चांगली सुधारणा होऊ शकते. या आठवड्यात तुम्ही एका व्यक्तीला, किंवा एका कामाला, किंवा एकाच गोष्टीला तुमचा पूर्ण वेळ देण्याची गरज आहे. एकाच वेळी अनेक कामे हाताळू नका. दिलेला शब्द पूर्ण करा, त्यासाठी शंभर टक्के प्रयत्न करा. एकोप्याने आणि चांगल्या भावनेने वागा.

**तूळः** हा सप्ताह तुमच्यासाठी अधिकाराचा आणि वर्चस्वाचा असणार आहे. तुम्ही करत असलेले काम मोठे होईल. विस्तार होईल. तुम्हाला एक महत्त्वाचा टप्पा गाठता येईल. बऱ्याच गोष्टींची सूत्रे तुमच्या हातात असतील. त्यामुळे तुम्हाला जबाबदारीने वागण्याची गरज आहे. वडील किंवा मोठ्या आदरणीय व्यक्तींचा दबदबा राहील. या आठवड्यात तुमचा आत्मविश्वास बळावेल. पण अती विश्वास, अभिमान, गर्व हे तुम्हाला बाधक ठरु शकतात. म्हणून पाय जमिनीवर ठेवा. सामर्थ्यवान अशी एखादी सुरुवात करा.

**वृश्चिकः** हा सप्ताह तुमच्यासाठी वेगवान असणार आहे. अडकलेली कामे पुढच्या टप्प्यापर्यंत पोचू शकतात. ध्येयाकडे चांगली वाटचाल होईल. सतत होत असलेल्या घडामोडींमुळे अस्थिर आणि अस्वस्थ वाटू शकतं. सडेतोड बोलणाऱ्या व्यक्तींशी सामना होईल. मतभेद होऊ शकतात. या आठवड्यात तुम्ही धडाडीने आणि विश्वासाने पुढे चालण्याची गरज आहे. तुमचे विचार स्पष्टपणे मांडा, रोखठोक वागा. बुद्धीचातुर्य वापरा. कोणत्याही बाबतीत वेळ गाठा, विलंब नको. प्रवासात वेगावर आणि वाहनावर चांगले नियंत्रण ठेवा, घाईगडबड नको!

**धनूः** हा सप्ताह तुमच्यासाठी उर्जायुक्त असणार आहे. तुम्ही तुमच्या ध्येयपूर्तीसाठी एक पाऊल पुढे टाकू शकणार आहात. झटपट घडामोडी घडू शकतात. तुमच्या नोकरीत, व्यवसायात किंवा घरातील आवडीच्या कामात एक प्रकारे नवीन चांगली चालना मिळेल. अडथळे येतील पण त्यावर तुम्ही कुशलतेने मात करू शकाल. काही प्रवास घडू शकतात त्यातून तुम्हाला आनंद होईल. या आठवड्यात तुम्ही तुम्हाला जे साध्य करायचं आहे त्यावर एकाग्रपणे काम करा. लक्ष विचलित होऊ देऊ नका. इतरांना देखील घेऊन पुढे चाला. आळस अजिबात नको.

**मकरः** हा सप्ताह तुमच्यासाठी परीक्षेचा असणार आहे. तुमचा संयम, तुमचा सात्विक भाव आणि तुमची सचोटी या गोष्टींना धक्का लागण्याचे प्रसंग येऊ शकतात. कामे रखडली जातील. काही प्रमाणात हतबल झाल्यासारखं वाटू शकतं. या आठवड्यात तुम्ही स्वतःला कणखर बनवण्याची गरज आहे. कुठल्याही आमिषाला भुलू नका. लाचारी पत्करू नका. सात्विक मनाला योग्य वाटत नसेल ते काम अजिबात करू नका. कोणतेही नियम मोडू नका. जोखीम उचलू नका. व्यसनात गुंतू नका. अती तिथे माती हे लक्षात ठेवा! आत्मसंयम ठेवा!

**कुंभः** हा सप्ताह तुमच्यासाठी तडजोडी करण्याचा आहे. अपेक्षित यश मिळवणे कठीण आहे. बरेच कष्ट करावे लागतील. कसलीतरी कमतरता जाणवेल. लोकांवर अवलंबून राहावं लागेल. इतरांकडून हीन वागणूक मिळू शकते. पण या सगळ्यातूनच आजची रात्र ही उद्याच्या पहाटेची चाहूल घेऊन येते याचा अनुभव तुम्हाला येईल. या आठवड्यात तुम्ही स्वतः संयम ठेवण्याची गरज आहे. गरजा कमी करा. सध्या मोठी गुंतवणूक किंवा महत्त्वाचे व्यवहार टाळा. परोपकार करण्याचा प्रयत्न करा. गरिबांना मदत करा. आरोग्य सांभाळा!

**मीनः** हा सप्ताह तुमच्यासाठी एक अवघड वळण घेऊन येत आहे. एखादे ध्येय हुकले जाऊ शकते. तुम्ही करत असलेले कष्ट या काळात कमी प्रमाणात फलित होतील म्हणून जास्त अपेक्षा न ठेवलेल्या चांगल्या. वास्तविक परिस्थिती पेक्षा तुमची मानसिक स्थिती कशी आहे यावर तुमचा हा काळ अवलंबून राहील. या आठवड्यात तुम्ही तुमच्या मनाला येईल तसे वागायला जाऊ नका कारण त्यात तुमची चुकण्याची शक्यता जास्त आहे. कोणत्याही प्रसंगात कोणाचा तरी आधार घेऊन, सल्ला घेऊन पुढे चाला. तुमच्याकडे जे नाही त्यापेक्षा जे आहे त्याबद्दल सकारात्मक विचार करा!

## पान १ वरुन

### चाळीस वर्षांपूर्वीचे बोफोर्स प्रकरण अखेर संपुष्टात

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापूर्वीही सीबीआय या प्रकरणात काही नवीन माहिती शोधण्यात गुंतलेली होती. एजन्सीने अमेरिकेच्या मायकल हर्शमन यांच्याशी संबंधित माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. हर्शमन यांनी २०१७ मध्ये सांगितले होते की, बोफोर्स कराराच्या चौकशीवर तत्कालीन सरकारने प्रभाव टाकला होता आणि ते स्वत: या प्रकरणात मदत करू इच्छित होते. परंतु जेव्हा सीबीआयने त्यांच्याशी संबंधित कागदपत्रे आणि नोंदी मागितल्या, तेव्हा काही विशेष हाती लागले नाही.

**आरोप-पैशांमधील संबंध सिद्ध झाला नाही**

बोफोर्स घोटाळा प्रकरणात कमिशनचा आरोप होता. पण हे सिद्ध होऊ शकले नाही की मिळालेले पैसे थेट या कराराशी संबंधित होते किंवा कोणत्याही आरोपीपर्यंत पोहोचले होते. त्यामुळे ठोस काहीही हाती लागले नाही.

### हिमाचल प्रदेशात बस अपघातात आठ ठार

कोसळली. अपघाताच्या वेळी बसमध्ये सुमारे २० ते २५ प्रवासी होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मदत व बचावकार्य सुरू केले. ग्रामस्थांनी अथक प्रयतकांनंतर अपघातग्रस्त बसमधून जखमींना बाहेर काढले आणि उपचारासाठी तिस्सा येथील रूग्णालयात दाखल केले.

### पीडित मुलांची गोपनीयता, सुरक्षित समुपदेशन आणि

माहिती देण्यासाठी नंदुरबार पोलिसांनी स्वतंत्र व्हॉट्सप क्रमांक सुरू करावा, ज्यावर विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिक गोपनीयपणे माहिती देऊ शकतील. माहिती देणाऱ्याची व पीडितांची ओळख पूर्णपणे सुरक्षित ठेवण्याबाबत पोलिसांनी जनतेला विश्वास द्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

अनेक वर्षे भीती आणि मानसिक त्रास सहन करणाऱ्या पीडित मुलांना न्याय मिळवून देण्यासाठी तपास निष्पक्ष, संवेदनशील आणि कोणत्याही दबावाशिवाय व्हावा. तसेच पीडितांना कायदेशीर मदतीबरोबरच सातत्यपूर्ण मानसोपचार आणि समुपदेशन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली.

### चेतन कोळीला तिन दिवसांची पोलीस कोठडी

हाती अश्लील व्हिडिओ आणि छायाचित्रे लागल्याची माहिती समोर आली आहे.

आरोपीकडून मिळालेल्या डिजिटल पुराव्यांमध्ये ६०० हून अधिक व्हिडिओ आणि १,००० पेक्षा जास्त अश्लील फोटो असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आल्याचे वृत्त आहे. या सामग्रीच्या आधारे पीडितांना धमकावल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास अधिक व्यापक करण्यासाठी मोबाईल फॉरेन्सिक पथकाची मदत घेतली जात असून, जप्त केलेल्या मोबाईल व डिजिटल सामग्रीची तपासणी करण्यात येत आहे. या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच पीडितांची संख्या वाढते का, याचा तपास पोलीस करत आहेत.

नंदुरबारमधील या गंभीर बाल लैंगिक शोषण प्रकरणामुळे पालकांमध्येही चिंता व्यक्त होत असून, पोलिसांच्या पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सोनगीर परिसरात शेळ्या-मेंढ्यांच्या चोरीचे सत्र सुरूच

शेतशिवारातून अज्ञात चोरट्यांनी सुमारे २५ मेंढ्या पळवल्या होत्या; तर याच रात्री शिंदखेडा तालुक्यातील वाघाडी खुर्द येथूनही १५ शेळ्यांची चोरी झाली होती. या दोन्ही घटना ताज्या असतानाच शुक्रवारी रात्री चोरट्यांनी पुन्हा एकदा आपला मोर्चा माळीच (ता. शिंदखेडा) येथील भीमराव वसंत देसले यांच्या शेताकडे वळवला.भीमराव देसले यांचे शेत वाघोदा-कलमाडी रस्त्यापासून ३०० मीटर अंतरावर आहे. शुक्रवारी रात्री १२ वाजेपर्यंत देसले हे स्वतः शेतातील बंदिस्त शेडमध्ये उपस्थित होते. त्यानंतर ते घरी झोपण्यासाठी आले. याचाच गैरफायदा घेत पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी शेडच्या तारेचे कुंपण आणि जाळी तोडून आत प्रवेश केला.

सकाळी देसले नित्यनियमाने शेतात गेले असता त्यांना शेडचे तारेचे कुंपण कापलेले दिसले. शेडमध्ये असलेल्या एकूण ४० शेळ्यांपैकी चोरट्यांनी शरीराने धडधाकड आणि वजनाने चांगल्या असलेल्या ३० शेळ्या पळवून नेल्या, तर लहान पिले व वयोवृद्ध शेळ्या मागे सोडून दिल्या.

अपंग शेतकऱ्यावर ओढवले आर्थिक संकट

पीड़ित भीमराव देसले हे अल्पभूधारक शेतकरी असून काही वर्षांपूर्वी झालेल्या एका अपघातात त्यांनी आपला एक पाय गमावला आहे. हलाखीच्या परिस्थितीत कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी त्यांनी गेल्या १० ते १२ वर्षांपासून शेतीला जोडधंदा म्हणून बंदिस्त शेळीपालनाचा व्यवसाय सुरू केला होता. हा व्यवसाय आता कुठे सुरळीत चालला असताना, एकाच रात्रीत ३० शेळ्या चोरीला गेल्याने त्यांना सुमारे ३ लाख रुपयांचा मोठा आर्थिक फटका बसला आहे. या घटनेमुळे देसले कुटुंबीय पार हवालदिल झाले आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन देसले यांनी तात्काळ ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधून माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच नरडाणा पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व माहिती जाणून घेतली.

मात्र, परिसरात गेल्या काही दिवसांपासून शेळ्या-मेंढ्यांच्या चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. अशा वेळी पोलीस प्रशासन मात्र ठोस कारवाई करण्याऐवजी पशुपालकांकडून केवळ साध्या कागदावर अर्ज लिहून घेतात आणि तक्रार नोंदवून घेतली आहे असे सांगून त्यांची समजूत काढतात, असा आरोप स्थानिक पशुपालकांमधून केला जात आहे. पोलिसांच्या या ढिसाळ कारभारामुळे चोरट्यांचे धाडस वाढले असून, या टोळीचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा व निष्पाप शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी तीव्र मागणी आता सोनगीर व शिंदखेडा परिसरातील ग्रामस्थ करत आहेत.

### चिराग गल्लीतील छतावर सात तलवारी आढळल्या

कबुतरखान्याच्या बाजूला पाण्याच्या टाकीच्या आडोशाला तलवारी लपवून ठेवण्यात आल्याचे आढळून आले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. तपासणीदरम्यान ७ धारदार लोखंडी तलवारी आढळून आल्या. पोलिसांनी त्या जप्त केल्या. या प्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ७४६/२०२६ अन्वये भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि. विकास गुंजाळ, मुकेश पवार, पोह. दिनेश चिते, जितेंद्र पाडवी, सुनील येलवे, मुकेश तावडे, मोहन ढमढेरे, चेतन साळवे, पोशि. मनोज महाजन, विनोद पाटील, रामेश्वर चव्हाण, हेमंत बारी, कल्पेश मोरे, अभय राजपूत तसेच मपोशि. रोहिणी धनगर यांच्या पथकाने केली.

### कॅ.दामलेंच्या वाढदिवसानिमित्त

गोविंद कुलकर्णी, मंगल मुकुंद कुलकर्णी, धनश्री सुहास कुलकर्णी, नीता श्रीकांत भंडारी, विद्याश्री देवेन चंद्रात्रे, रूपाली सौमेश्वर जोशी यांना शिलाई मशिन वाटप करण्यात आले. अजून काही महिलांना लवकरच मशिनचे वाटप करण्यात येणार आहे.

### खराब वाल्व्हमुळे पाणीपुरवठा विस्कळीत

या तांत्रिक व नैसर्गिक अडचणींवर मात करण्यासाठी धुळे महानगरपालिकेकडून दुरुस्तीचे काम तातडीने युद्धपातळीवर सुरू आहे. शहरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत विलंबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्याबाबत प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन धुळे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे करण्यात आले आहे.

## पान १ वरुन

### सौ.विमलादेवी ओमप्रकाश अग्रवाल रुग्णालयाचे

महिला व बालकल्याण सभापती उज्ज्वला ठाकरे, उपसभापती शोभा भिल, महापालिकेच्या आरोग्याधिकारी डॉ. संपदा कुलकर्णी, जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवी सोनवणे आदी प्रमुख पाहुणे असतील.

**विविध यंत्रसामग्रीने सुसज्ज रुग्णालय**

नगरसेविका सारिका अग्रवाल व चित्रलेखा परदेशी सूचक असलेले हे अत्याधुनिक रुग्णालय शहरातील चक्करबर्डी परिसरातील महाराजा अग्रसेन टाउनशिप परिसरात उभारण्यात आले आहे. या मल्टिस्पेशालिटी रुग्णालयाची वैशिष्ट्ये म्हणजे या रुग्णालयात मेंदू, अस्थिरोग, स्त्रीरोग, किडनीसह विविध आजारांवर अत्याधुनिक उपकरणे व यंत्रसामग्रीच्या सहाय्याने उपचारांसह विविध शस्त्रक्रियांची सुविधाही उपलब्ध आहे. या रुग्णालयात सद्यःस्थितीत २६ बेड उपलब्ध असून, सर्व अतिदक्षता विभागासारखे वातानुकूलित आहेत. या रुग्णालयात काही आजारांवर सवलतीच्या दरात तर काही आजारांवर मोफत उपचार होणार आहेत.

रुग्णालयाच्या या लोकार्पण सोहळ्यास धुळेकर नागरिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन नगरसेविका सारिका अग्रवाल, चित्रलेखा परदेशी, एबी फाउंडेशनचे अध्यक्ष कमलेश देवरे यांनी केले.

**रुग्णालयाला स्व. विमलादेवी अग्रवाल यांचे नाव**

महापालिका व एबी फाउंडेशनच्या संचलित या रुग्णालयाचे शहराचे आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या मातोश्री (स्व.) विमलादेवी ओमप्रकाश अग्रवाल असे नामकरण करण्यात आले आहे. स्व. विमलादेवी अग्रवाल यांनी कुटुंब सांभाळून सामाजिक व राजकीय जीवनात योगदान दिले. त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यकारिणीचे सदस्यपदही भूषविले होते. यानंतर १९९२ ते २००२ अशी सलग दहा वर्षे भाजपच्या धुळे शहराच्या नगरसेविका म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. त्यांनी लक्ष्मी महिला सामाजिक, शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून उडाणे (ता. धुळे) येथे आदिवासी आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय सुरू करून गोरगरीब, आदिवासी भागातील मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे मोलाचे कार्य केले. रविवारी (ता.९) त्यांच्या जयंतीनिमित्त या रुग्णालयाचे लोकार्पण होऊन ते शहरातील सर्वसामान्य जनतेच्या आरोग्यसेवेसाठी खुले होत आहे.

### प्रतापपुर दुकान फोडले रोकड चोरली; साहित्य जाळले

वाजेच्या दरम्यान ही घटना घडली. या प्रकरणी ७ रोजी मध्यरात्री गुन्हा दाखल करण्यात आला. चोरट्याने दुकानाचे शटरचे कुलूप उघडून आत प्रवेश केला. काउंटरच्या गल्लयात ठेवलेली १ लाख २० हजार रुपयांची रोकड लंपास केली. यात ५०० रुपयांच्या २०० नोटा आणि १०० रुपयांच्या २०० नोटांचा समावेश आहे. त्यानंतर दुकानाला आतून आग लावून नवीन कटलरीचे साहित्य, नवीन चपलांचा कट्टा, नवीन कपडे तसेच दुकानातील फर्निचर जाळून नुकसान केले. या घटनेत एकूण १ लाख ७० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोहेकॉ/१०५२ जोगेश वळवी करीत आहेत. पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोनि अर्जुन पटले यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

### शहरात नऊ दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत

प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे.मग नऊ दिवसांपासून पाणीपुरवठा का विस्कळीत आहे,याचे उत्तर प्रशासनाने धुळेकरांना द्यावे.निवडणुकीपूर्वी दररोज पाणी देऊ, दोन दिवसांआड पाणी देऊ अशी आश्वासने देणारे सत्ताधारी आणि लोकप्रतिनिधी आता कुठे आहेत? त्यांनी समोर येऊन धुळेकरांच्या प्रश्नांना उत्तरे द्यावीत,अशी मागणीही रघुवंशी यांनी केली. धुळेकरांच्या मतांवर निवडून येऊन सत्ता मिळवायची आणि त्याच धुळेकरांना साधे पिण्याचे पाणीही नियमित देता येत नसेल,तर विकासाच्या गप्पांचा उपयोग काय?असा सवाल त्यांनी उपस्थित केला. धुळे शहराच्या पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन का करण्यात आले नाही,पाणीपुरवठा नेमका कोणत्या कारणामुळे बंद आहे,मुबलक पाणी असतानाही नागरिकांना पाण्यापासून वंचित का राहावे लागत आहे,तसेच पाणीपुरवठा पूर्ववत करण्यासाठी प्रशासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे,याची माहिती महानगरपालिका प्रशासनाने जाहीर करावी,अशी मागणी त्यांनी केली. धुळेकरांना आश्वासन नको, त्यांच्या नळाला नियमित पाणी हवे आहे.सत्ताधाऱ्यांनी आणि महानगरपालिका प्रशासनाने आता गप्प न बसता जनतेसमोर येऊन उत्तर द्यावे.पांझरा नदी वाहत असताना धुळेकरांच्या घरातील नळ कोरडे का आहेत,हा प्रश्न आज प्रत्येक धुळेकर विचारत आहे,असे आलोक रघुवंशी यांनी सांगितले.

## जवाहर कुस्ती स्टेडियम विकासासाठी दोन कोटींचा निधी
## कुस्ती मॅटसह आधुनिक सुविधांची भर- रवींद्र आघाव

धुळे, दि.८- शहराच्या क्रीडा इतिहासातील मानाचे पान असलेल्या जवाहरलाल कुस्ती स्टेडियमच्या नूतनीकरणाला सुरुवात झाली आहे. गेल्या काही वर्षांपासून दुरवस्थेत असलेल्या या ऐतिहासिक स्टेडियमच्या विकासासाठी धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनी दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून स्टेडियमचे अत्याधुनिक पद्धतीने नूतनीकरण करण्यात येणार असल्याची माहिती धुळे तालुका कुस्तीगीर तालीम संघाचे अध्यक्ष रवींद्र आघाव ऊर्फ गड्ड्या पहिलवान यांनी पत्रकार परिषदेप्रसंगी दिली.

पत्रकार परीषदेप्रसंगी धुळे तालुका कुस्तीगीर तालीम संघाचे



अध्यक्ष रवींद्र आघाव ऊर्फ गड्या पहिलवान, सचिव दिलीप जगताप, योगेश चव्हाण, अशोक कराड ऊर्फ फोमा पहिलवान, नंदलाल दरगुडे पहिलवान, पिंटू यादव पहिलवान, संजय चौधरी, नंदलाल फुलपगारे, बाबा कोळी, दत्तू आप्पा कल्याणकर, कृष्णा शिंदे, विनायक काकडे, युनूस शेख, समीर गवळी, रमेश लहामगे, राम सोनवणे, संजय महाले, जमील भाई, संदीप पाटोळे व राजेंद्र देवरे उपस्थित होते.

जवाहरलाल कुस्ती स्टेडियमला धुळ्याच्या क्रीडा क्षेत्रात मोठा ऐतिहासिक वारसा आहे. १३ ऑक्टोबर १९६४ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांच्या हस्ते आणि तत्कालीन नगराध्यक्ष भगवान नाना लोकरे यांच्या उपस्थितीत या स्टेडियमचा शुभारंभ झाला होता. या मैदानावर देश-विदेशातील नामवंत मल्लांच्या कुस्त्या रंगल्या असून, अनेक कुस्तीपटूंच्या क्रीडा कारकिर्दीला या मैदानाने व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. मात्र, कालांतराने देखभाल-दुरुस्तीअभावी स्टेडियमची अवस्था खराब झाली होती. कुस्तीपटूंना आवश्यक सुविधा मिळत नसल्याने स्टेडियमच्या नूतनीकरणाची मागणी सातत्याने होत होती.

या पार्श्वभूमीवर धुळे तालुका कुस्तीगीर तालीम संघाचे अध्यक्ष रवींद्र आघाव ऊर्फ गड्या पहिलवान यांनी आपल्या सहकाऱ्यांसह धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल तसेच मा.आ.राजवर्धन कदमबांडे यांची भेट घेतली. स्टेडियमची सद्यस्थिती आणि कुस्तीपटूंना भेडसावणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून देत स्टेडियमच्या सर्वांगीण विकासाची मागणी करण्यात आली. कुस्ती क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेत आमदार अनुप अग्रवाल यांनी विकासकामांसाठी दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. या निधीतून स्टेडियमला नवीन छत बसविणे, आंतरराष्ट्रीय दर्जाची कुस्ती मॅट बसविणे, दोन स्वतंत्र खोल्या, कार्यालय, प्रेक्षक गॅलरीचे नूतनीकरण, शौचालयांची सुविधा, अत्याधुनिक फोकस लाइट्स, आधुनिक विद्युतीकरण तसेच अत्याधुनिक स्टेज उभारण्याची कामे करण्यात येणार आहेत. कुस्ती स्टेडीयमच्या नुतनीकरणामुळे धुळेकर कुस्तीप्रेमी आणि मल्लांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नूतनीकरणानंतर जवाहर कुस्ती स्टेडियममध्ये कुस्तीपटूंना आधुनिक सुविधा उपलब्ध होतील. तसेच भविष्यात येथे मोठ्या प्रमाणावर राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

## पान १ वरुन

### छ.शिवाजी महाराज स्मारक कॉंक्रिटीकरणास सुरूवात

रस्त्याबाबत संबंधित नागरिकांनी आमदार अनूप अग्रवाल, महापौर मायादेवी परदेशी यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. आता या रस्त्याचे काम सुरु झाल्याने वाहतुकीची समस्या सुटणार असून अपघाताचा धोकाही कमी होणार आहे. शिवाय बीएसएनएल ऑफीजवळ पाणी साचत होते, तेथे गटार होणार असल्याने ही समस्याही सुटणार आहे. यावेळी नगरसेवक चेतन गवळी, रोहित चांदोडे,सामाजिक कार्यकर्ते विक्की परदेशी व विक्की महाले उपस्थित होते. त्यांनी स्वतः या कामात लक्ष घातले आहे.

### शांतीनाथ नगर, अजबे नगरात चोरट्यांचा उच्छाद

कैद झाल्या आहेत. चोरटे पहाटे सुमारे घरात शिरले आणि सकाळी पाच वाजून पंचावन्नच्या सुमारास बाहेर पडल्याचे फुटेजवरून दिसून येत असल्याचे प्राध्यापक शर्मा यांनी सांगितले.

तीन महिन्यांपासून बंद घरे फोडली

शर्मा यांच्या बंगल्यापासून काही घरे पुढे संतोष कुंदनमल जैन यांचे घर आहे. जैन हे गेल्या तीन महिन्यांपासून कुटुंबासह अमेरिकेत मुलीकडे गेले आहेत. तर त्यांचा मुलगा पुणे येथे नोकरीस आहे. शनिवारी सकाळी जैन यांच्या घराचा दरवाजा उघडा असल्याचे परिसरातील रहिवाशांच्या निदर्शनास आले. त्यांनी पुण्यातील जैन यांच्या मुलाला फोन करून माहिती दिली. त्यानंतर मुलाने फुले कॉलनीत राहणारे चुलत भाऊ गणेश जैन यांना तातडीने घरी जाण्यास सांगितले. गणेश जैन यांनी पाहणी केली असता घरातील सामान अस्ताव्यस्त फेकलेले दिसून आले. वरच्या मजल्यावरील सामानाचीही चोरट्यांनी उचकापाचक केली होती. पुण्यातील भावाशी संपर्क साधल्यानंतर घरात सुमारे तीन लाख रुपये रोख तसेच चांदीचे शिक्के असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे या घरातूनही मोठ्या प्रमाणात ऐवज चोरीला गेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

**दुसऱ्या घरात चोरी केली**

प्राथमिक माहितीनुसार, चोरट्यांनी सर्वप्रथम संतोष जैन यांच्या बंद घरला लक्ष्य केले असावे. त्यानंतर ते परत जात असताना प्राध्यापक शर्मा हे त्यांच्यासमोरच घराला कुलूप लावून बाहेर पडले. याचा फायदा घेत चोरट्यांनी शर्मा यांच्या घरात प्रवेश करून अवघ्या काही मिनिटांत चोरी केली आणि तेथून पसार झाले असावेत, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक कार्यकर्ते दीपक कोळी व अशोक सुडके यांनी पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भामरे, पोलीस कॉन्स्टेबल हिमांशू ठाकूर, शाकीर शेख तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे हेड कॉन्स्टेबल योगेश चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी श्वानपथकासह फिंगरप्रिंट पथकाला पाचारण केले. फिंगरप्रिंट विभागाचे पीएसआय धनंजय मोरे आणि हेड कॉन्स्टेबल प्रकाश भावसार यांनी घटनास्थळावरून ठसे व इतर पुरावे अ

संकलित केले. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा माग काढण्याचे काम सुरू असून, एकाच टोळीने दोन्ही घरांमध्ये चोरी केली असण्याची शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे. साक्री रोड परिसरात एकाच वेळी झालेल्या या धाडसी घरफोड्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांनी चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

### धुळ्यात १० ऑगस्टला रास्ता रोको

खंडू सामुद्रे आदी कार्यकर्त्यांचा समावेश आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून कॉर्पोरेट धोरणांचे व कामगार विरोधी ४ श्रमसंहिता रद्द कराव्यात, आठ तासांच्या कामासाठी दरमहा किमान तीस हजार रुपये वेतन लागू करावे, खाजगी उद्योग व शासकीय विभागातील कंत्राटी व शिकाऊ कामगारांना कायम करावे, तसेच अंगणवाडी, आशा, गटप्रवर्तक, शालेय पोषण, राष्ट्रीय अभियान कर्मचारी इत्यादी योजना कर्मचाऱ्यांना कायम करून इएसआय, पीआय व पेन्शन लागू करण्यात यावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. यासोबतच असंघटीत कामगारांसाठी स्वतंत्र सामाजिक सुरक्षा कायदा लागू करावा, कल्याणकारी योजना कार्यान्वित कराव्यात, शेती मालाला सी२ + ५०% नुसार हमीभाव द्यावा, इलेक्ट्रीक स्मार्ट मीटर बंद करून गावठाण फिडरवरील लोडशेडिंग थांबवून २४ तास घरगुती लाईट सुरू ठेवावी, वाढती महागाई व बेरोजगारीला रोखावे आणि एन.टी.आय. परीक्षा रद्द करावी, या मागण्यांसाठी हे जेलभरो आंदोलन करण्यात येणार आहे


**भाड्याने देणे आहे**

MIDC अवधान येथील सर्व सोयीयुक्त कमर्शियल जागा ९५० स्के.फुट गाळे सहित, गृह उद्योगासाठी, लघुउद्योगासाठी, ऑफिससाठी, गोडाउनसाठी, राहण्यासाठी, करारानुसार भाड्याने देणे आहे.
: संपर्क: 8446456416

**पाहिजेत**

- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट

संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**शेती विकणे आहे**

खाते नं. २०१, भुमापन व उपविभाग क्र. ६३३/१ बोअरिंग १, सौर उर्जा बसविले आहे. : १ एकर खामगाव रोड इंग्लीश मेडियमचे पाठी मागे नंदुरबार
: संपर्क :
बिंदीया रमेश साळवे
7066559455
9422288948

**विकणे आहे**

वलवाडी गोंदुर रोड दुकान फर्निचर पीओपीसह विकणे आहे. व भोकर शिवारात विमानतळ फाटा सर्व्हे नं.९/१/२ मधील प्लॉट विकणे आहे.
9011894666

**पाहिजेत**

टायपिस्ट म्हणून मुलगा/ मुलगी पाहिजेत. इच्छुकांनी सायंकाळी ६ वाजता समक्ष भेटावे.
अनुभवी व्यक्तीस प्राधान्य
श्रीविनायक डायग्नोस्टीक सेंटर
हॉटेल गणपती पॅलेस समोर, मालेगाव रोड, धुळे

**फार्म हाऊसवर राखणदार पाहिजे**

फागणा येथे फार्म हाऊसवर कुटुंबासह राखणदार पाहिजे, रहायला पक्के घर, विज, पाणी सर्व मिळेल वय साठ वर्षा पर्यंत, फागणा सर्व सुविधा आहेत. भेटा धुळे येथे सर्व माहितीसाठी
०८८८८८२०५६५

**दुकान विकणे आहे**

मुख्य बाजारपेठ मधील गल्ली नं.४ येथील बालाजी मंदिरासमोर क्षेत्र (१०.०१) चौ.मी दुकान योग्य किंमतीत विकणे आहे.
– संपर्क –
8830291946

**पाहिजे**

ऑफिस कामासाठी Video Editor व Computer Operator पाहिजे
-: संपर्क :-
7666176855
अभय कॉलेज रोड, राम नगर, धुळे

**पाहिजेत**

होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.
१)कॉम्प्युटर ऑपरेटर अकाऊन्टंट
२) सेल्समन बाहेर गावांसाठी
३) मदतनीस
-: संपर्क :-
संजय मेडिकल्स
गल्ली नं. २ धुळे

**शेती घेणे**

नगांव ते सोनगिर हायवे टच पाईप लाईनच्या विरुद्ध दिशेला १ ते २ एकर शेती विकत घेणे आहे.
९४२३९२७३६०

**प्लॉट विकणे**

बडगुजर प्लॉट भागात ३ रोड कॉर्नर ५००० स्क्वे.फुट (५०x१००) क्लिअर टायटल व क्लिअर पजेशन प्लॉट
९४२३९२७३६०

**पाहिजेत**

दाताच्या दवाखान्याच्या कामासाठी पुर्णवेळ, अर्धवेळ, मुलगा-मुलगी पाहिजे.
9823546330

**GOLD'S GYM पाहिजेत**

जेन्टस पर्सनल ट्रेनर - 4
जेन्टस ट्रेनर - 4
लेडीज ट्रेनर - 2
गोल्डस जिम, गांधी चौकाजवळ, आग्रा रोड, धुळे
संपर्क : 7517991991

**दुकान भाड्याने देणे**

दुकान भाड्याने देणे आहे
9422286432

**गरम पाण्याचा एकच उपाय...**

BAJAJ Crompton Racold USHA




आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...

59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०